स्वतंत्र भारताच्या
संविधानावर
आधारीत
लोकशाहीचे
रक्षण करा!
कष्टकरी जनतेची
व्यापक एकजूट
उभारा!



# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

ऑगस्ट २०१८











# अनुक्रमणिका


* संपादकीय
* स्वातंत्र्य भारतापुढील आव्हाने! —कॉ. सुरेश धोपेश्वरकर
* कॉ. कृष्णा मेणसे यांची मुलाखत – वृषाली मृगदूम
* कविता माझ्या माणसांनो – जयंत गडकरी
* आमचा ''पैसा'' आमचे नियोजन – हेमराज पाटील
* जन्माला न आलेला ''जिओ'' – रामचंद्र गुहा
* समानतेच्या वाटेवर – संतोष भोई
* स्त्रीचे स्थान कुटुंब समाज – जयश्री पाटील
* एकजूट महिलांची – अलका कुंभार
* महिला आणि निर्णय स्वातंत्र्य – अख्तर शेख
* भारत - सुजलाम् सुफलाम – आरती पवार
* सन्मान स्त्रियांचा – संजीव पवार
* वसा सावित्रिचा – वदंना बजकर
* माहेरची माया – दीक्षा गोरे
* भारत - एक महान राष्ट्र – राजश्री विठ्ठल जाधव
* समानतेची माझी संकल्पना
* माझ्या स्वप्नातील भारत



**संपादकीय मंडळ**

● डॉ. मेधा पुरव-सामंत

● कॉ. सुरेश धोपेश्वरकर

● वृषाली मगदूम

● श्यामला पवार

● बाळासाहेब पिसाळ

**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई फ्लॅट नं १८, कोपरी गाव, वाशी नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

# स्वतंत्र भारतापुढील आव्हाने!

येत्या १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्यास ७१ वर्षे पूर्ण होत आहेत, भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अन्नपूर्णा परिवारातील सर्व सभासदाना हार्दिक शुभेच्छा.

सातत्याने बदलणाऱ्या, आधुनिक विज्ञान तंत्रज्ञाने चालणाऱ्या जगात भारतीय राष्ट्राचा आणि भारतीय समाजाचा संदर्भ टिकविणे आणि जनतेचा समन्यायी आर्थिक सामाजिक विकास करण्याचे पहिले आव्हान आजच्या आपल्या स्वतंत्र भारतापुढे आहे.

भारतात सध्या केन्द्र सरकार आणि विविध राज्य सरकारे चालविणाऱ्या भाजपस असे वाटते की प्राचीन आणि सनातनी परंपराची पोपटपंची केल्याने, वेद प्रमाण्य मान्य केल्याने, मनुस्मृतीच्या आधारानें स्वतंत्र भारतातील समाजाचे पुर्नसंघटन केल्याने बदलत्या जगात भारतीय समाजाचा संदर्भ टिकेल. थोडक्यात ''हिंदुराष्ट्र'' निर्माण केल्याने भारतीय समाजा पुढील सर्व प्रश्न चुटकीसारखे सुटतील.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० ला स्वतंत्र भारताने धर्मनिरपेक्ष समाजवादी भारताची निर्मिती करण्याचे ठरविले. या संविधानाने प्रत्येक नागरिकांस आपापल्या धर्मानुसार आचरण आणि व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य दिले, पण भारतीय प्रजासत्ताक कोणत्याही धर्मावर आधारीत नसेल हे स्पष्ट आणि निसंदिग्धपणे सांगितले.

२०१४ च्या मे महिन्यात मोदी सरकार राज्यावर आल्यानंतर संविधानाने निर्माण केलेल्या या मूल्यावर, या मूल्यांना अनुसरून निर्माण झालेल्या शिक्षण पद्धतीवर, विविध घटनात्मक संस्थावर हल्ले वाढत आहेत. सुप्रिम कोर्टाचा या वाटचालीत अडथळा होईल म्हणून न्यायाधीशाच्या नेमणूकामध्ये केन्द्र सरकारतर्फे सातत्याने दफ्तर दिरंगाई चालढकल केली जात आहे.

यंदाच्या वर्षी सुप्रीम कोर्टाच्या चार न्यायाधीशांनी घेतलेली पत्रकार परिषद, नुकताच लोकसभेत मांडण्यात आलेला अविश्वास ठराव, २०१९ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या निवडणूका या ह्या संदर्भात आपण पाहिल्या पाहिजेत.

स्वतंत्र भारताचे रक्षण, संवर्धन, आर्थिक विकास, आर्थिक सामाजिक विषमता कमी करणे, सांस्कृतिक सभ्यता वाढविणे या साठी स्वतंत्र भारताने निर्माण केलेले प्रभावी साधन, हत्यार, म्हणजे भारतीय संविधानाचा पाया भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे हा आहे. त्याचे ''हिंदूराष्ट्र'' हा पाया करणे म्हणजे संविधान पायदळी तुडविणे होय.

काही लोकांना भारतात जर ८० टक्के हिंदू नागरिक आहेत तर

त्याला ''हिंदूराष्ट्र'' म्हटले तर काय हरकत आहे, असा भाबडा प्रश्न विचारला जातो काही लोकातर्फे राज्यसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश असला तर काय बिघडले असा भाबडा प्रश्न विचारला जातो. बहुसंख्याकाची जीवनपद्धती आहार, विहार, कपडे लत्ते, रहनसहन, अल्पसंख्याकारवर लादली तर काय बिघडणार आहे असे ब्रेन वाशिग सध्या समाजात सातत्याने करून दुही माजविण्यात येत आहे.

२६ जानेवारी १९५० रोजी घटना स्विकारण्यापूर्वी घटना समितीत दोन अडीच वर्षे झालेल्या चर्चेत पंडीत जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल, मौलाना अब्दुल कलम आझाद, समाजवादी-कम्युनिस्ट यांनी जोरदार प्रतिवाद करून ''धर्म निरपेक्ष'' भारताची उभारणी करण्याचा संकल्प केला.

भारताच्या १२५ कोटी लोकसंख्येत ८० टक्के हिंदू आहेत. २० टक्के इतर आहेत. परंतु हिंदूच्या चालिरिती, उपासना पद्धती यासुद्धा वेगवेगळ्या आहेत.

भारतात विविध धर्माचे, भाषेचे, संस्कृतीचे, प्रातांचे लोक भारतीय संविधानानुसार परस्पर व्यवहार करत असतात. भारतीय राज्यव्यवस्थेत केन्द्र आणि राज्य याच्यातील कामकाजाची विभागणी संविधानानुसार केलेली आहे. भारताचे पार्लमेंट किंवा राज्यातील विधानसभा कोणताही कायदा या संविधानाचा भंग करून करू शकत नाही. तसा प्रयत्न केल्यास पार्लमेंटने बहुमताने पास केलेला कायदा हा सुप्रीम कोर्ट रद्द करते.

भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुता, विषमता नाहिशी करणे ही आपल्याला मूल्य व्यवस्था दिली आहे.

स्त्रियावर होणारे विविध प्रकारचे अत्याचार, मग तो कुटुंबातील हिंसाचार असो, बलात्कारासारखा घृणास्पद प्रकार असो, हुंडाबळीचा प्रकार असो, कुणाशी प्रेम विवाह करण्याचा प्रश्न असो. मासिक पाळीच्या काळातील देवळातील प्रवेशाचा प्रश्न असो, समान कामासाठी समान वेतन दाम मिळण्याचा प्रश्न असो हे सर्व स्त्रियांसाठीचे कायदेशीर हक्क भारत स्वतंत्र झाल्यामुळे आणि त्यांनी संविधानावर आधारलेली लोकशाही स्विकारल्यामुळे शक्य झाले आहे. लोकशाहीत निर्णयात न्याय मिळण्यात उशीर होत असल्याचे जाणवेल पण लष्करशाही, किंवा एकाद्या व्यक्तीची किंवा पक्षाची हुकुमशाही हा संविधानावर आधारलेल्या लोकशाहीला पर्याय होऊ शकत नाही. अशी जाणीव जागृती या स्वातंत्र्य दिनापासुन आपल्या कुटुंबात वस्ती पातळीवरील आपल्या सभा मधून, प्रत्येक सभासदात करूया. संविधानावर आधारित लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला धर्म, जात किंवा लिंग निरपेक्ष राहून विकासाची संधी आहे. त्याचे रक्षण करूया.

भारतात आज तरुण तरुणीची संख्या ३५ टक्के आहे. या तरुणापुढील सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे बेकारीचा एकूण २ कोटी नोकऱ्याची गरज असताना केवळ ५ लाखाच्या आसपास नोकऱ्या किंवा रोजगार निर्माण होत आहेत.

देशांतील धनदांडगे नव्या गुंतवणूकी करत नाहीत. नविन छोटे, मध्यम उद्योगाची रोजगार देण्याची क्षमता असताना त्याचा विकास करण्याऐवजी भांडवल धन नविन तंत्रज्ञानावर आधारलेला कारखाना उघडून त्या मार्फत कमी कामगाराना कामावर ठेवून अधिक नफा सुपर प्रॉफिट कमावण्याकडे उद्योगपतीचा कल आहे, आणि त्यांना प्रोत्साहन आणि त्याची पाठराखण करणे सरकारचे धोरण आहे. त्यामुळे आज एका बाजूने १० लाख कोटी रुपयाची १० हजार उद्योगपतीनी घेतलेली कर्जे थकविली आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्थेत आणि बँकिंग व्यवसायातील उलाढालीचा वेग मंदावला आहे.

शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत आहेत. हवामान बदलांमुळे शेतकऱ्यांवर एकाबाजूने अस्मानी संकटे येत आहेत. तर दुसऱ्या बाजूने पिकविलेल्या मालास योग्य आणि किफायतशीर भाव न मिळण्याचे सुलतानी संकट आहे. परिणामी शेतकरी आत्महत्या करीत आहेत, शेती सोडून जात आहेत. खेडी ओस पडत आहेत. आणि शहरे बकाल होत आहेत. आर्थिक विकास अधिका अधिक श्रमिक कष्टकरी जनतेला केन्द्रस्थानी ठेवून आखला पाहिजे आणि त्याची ठराविक काळात अंमलबजावणी झालीच पाहिजे. असा राज्यकर्त्यांवर दबाव आणणे त्यासाठी वस्ती पातळीवरील कष्टकऱ्यांची एकजूट अधिक बळकट करुया. त्यांना आर्थिक प्रश्नांची अधिक माहिती करून देऊया प्रगल्भ जाणीव असलेली सजग कष्टकरी जनता हीच भारतीय स्वातंत्र्याची, स्वतंत्र भारताच्या आर्थिक स्वायत्ततेची, भारताची खरीखुरी भाग्य विधाती आहे. याची जाणीव समाजात जागृत करूया. आर्थिक सामाजिक विषमतेविरुद्धची लढाई ही सर्वांना समान संधी देणाऱ्या लोकशाही व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग बनविणे अत्यंत गरजेचे आहे. त्या करिता आपल्या अन्नपूर्णा सारख्या कष्टकरी महिलाच्या जनतेच्या संघटनाची व्यापक सांखळी उभारणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे संविधानावर आधारलेली लोकशाही धनदांडग्याच्या अदानी अंबानी याच्या घरची दुभती गाय होणार नाही.

धनदांडग्याकडून आणि धर्मांध जातीयवादी शक्तीकडून आपल्या देशाच्या संविधानावर आधारलेल्या लोकशाहीचे रक्षण करणे त्यामुळे सोपे होईल.

संवादच्या स्वातंत्र्य दिनाच्या या अंकात बेळगावमधील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि अन्नपूर्णा महिला मंडळाचे मागदर्शक कॉ. कृष्णा मेणसे याचा परिचय करून देणारा लेख छापला आहे.

तसेच ''आमचा पैसा आमचे नियोजन'' हा लोकसहभागातून आर्थिक विकासास कशी चालना देता येईल, या संबंधी माहितीपूर्ण लेख आहे.

जिओ विद्यापीठासंबंधी रामचंद्रगुहा याचा लेख छापला आहे.

आपल्या सभासदाचे त्याच्या मुलामुलीचे वस्ती पातळीवरील प्रतिनिधी (C.R.) तसेच फ्रेंच्यायसीचे इचलकरंजी, बीड, पर्वती संस्था याच्या सभासदानी त्याच्या स्वप्नातील भारताबद्दलची आणि स्त्रियांचे अधिकार मनोगते मांडली आहेत.

अन्नपूर्णा महिला मंडळाच्या संस्थापक प्रेमाताई पुरव याचा १५ ऑगस्ट रोजी वाढदिवस असतो. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी त्यांनी ८३ वर्षे पूर्ण करून ८४ वर्षात प्रवेश केला आहे; त्याचे वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन.

❐

# कॉ. कृष्णा मेणसे यांची मुलाखत

■ वृषाली मगदूम

१) आपले पूर्ण आयुष्य आपण सार्वजनिक कामासाठी वाहिलेत. अहोरात्र पक्ष-बांधणी, जन आंदोलन, कार्यकर्ता घडविणे पक्ष बळकट करणे यासाठी व्यतीत केलेत.  तर हे सारे कोठून आले. आपल्या बालपणात याची काही बिजे आहेत का? आपल्या बालपणाविषयी सांगा, आपले बालपण कसे गेले. घरातील वातावरण कसे होते.

माझा जन्म ९ फेब्रुवारी १९२८ रोजी झाला. बेळगाव शहरातील मेणसे गल्लीत माझे घर आहे. माझे वडील परशुराम शेतकरी होते. माझी आई आनंदी आणि अतिशय धीट होती. पुरुषाच्या बरोबरीने शेतात कामे करायची. आजोबा महादेव हेही शेतकरी होते व निरनिराळ्या सामाजिक कामात भाग घेत असत. वारकरी संप्रदायाचे संस्कार माझ्या बालपणी माझ्यावर झाले. समाजामध्ये समता स्थापन करण्याचा विचार बालपणीच माझ्या मनात रुजला. माझ्या घरात मी शेवटचा म्हणजे आठवा मुलगा होतो. बालपणीच मला शेतीच्या कामाची ओळख झाली होती. घरची परिस्थिती तशी जेमतेमच होती. शेतीवरच आमची गुजराण व्हायची. आजूबाजूला सर्व कष्टकरी समाज होता. या कष्टकरी जनतेचा मी एक भाग होतो. या समाजाच्या सुख-दु:खाची ओळख बालपणीच झाली. मी मराठा समाजात जन्मलो, जिथे शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी होते. माझ्या घरात शाळेत जाणारा मीच पाहिला होतो. माझ्या वर्गात सर्व जातीधर्माची मुले होती. मुलींसाठी शाळा वेगळी होती. स्वातंत्र्याची ठिणगी पाचवीत असतानाच बर्डे गुरुजींनी आमच्या मनात पेटवली. ते पेपरमधील बातम्या वाचून दाखवत देशभक्तीचे बीजारोपण त्यांनी केले. खादी वापरण्याची प्रेरणा मला बालपणी मिळाली. शाळा सुटल्यावर बर्डे सर आम्हाला खो खो, कबड्डी ही शिकवायचे बर्डे मास्तरच्या प्रेरणेने मी राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित झालो. इतक्या लहान वयात आम्ही प्रभात फेरी काढून वंदे मातरम म्हणत असू. सहावीत असताना मी सभेचे फलक तयार करणे. भूमिगत लोकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवणे. अशी कामे करीत असे. सहावीत मला राष्ट्रीय चळवळीचा परिचय झाला. तर सातवीत सत्यशोधक चळवळीची ओळख झाली. समाजसुधारणेच्या कामाचे संस्कार देसाई गुरुजींकडून झाले. मी सातवीत असताना जाहीर सभेत आवेशपूर्ण भाषणे करायचो. १९४१ साली सातवी पास होणारा आमच्या घरातला मी एकमेव असल्याने माझे खूप कौतुक झाले. १९४१ साली बेळगावात अंधश्रद्धेचे प्रमाण खूप होते. त्या काळात बेळगावात दर्जेदार व्यायामपट्टू व पैलवानही होते. मीही मल्लखांबाचे प्रशिक्षण घेतले होते. नाटके, भजनेही व्हायची. नागपंचमी, दसरा, लक्ष्मीपूजन हे सण उत्साहात साजरे होते. कष्टकरी वर्ग सणाला खूप खर्च करीत असे. आजूबाजूला सामाजिक, सांस्कृतिक जग पाहात मी शिकलो. जग समजून घेण्याचा प्रयत्न केला.

२) तुमच्या मनात चळवळीचे व सामाजिक कार्याचे बीज बालपणीच पेरले गेले. कर्नाटक व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांत तुमच्या धडाडी, कार्यातील सातत्य, अभ्यासूवृत्ती, श्रमिकांशी बांधिलकी

या व इतर अनेक गुण-वैशिष्ट्यांनी तुम्ही सर्वांना परिचित आहात. तरुण रक्त हे सळसळतं असतं. मागचा-पुढचा विचार न करता स्वत:ला झोकून देते तर तुमच्या या तारुण्यातील धडाडीविषयी ऐकायला आवडेल.

मी सातवी पास झालो व माझे वडील अचानक गेले. माझ्यासाठी हा धक्का होता. याच वेळी मी पक्षाचा पूर्णवेळ कार्यकर्ता झालो. मराठा मंडळ शिक्षण संस्थेत हायस्कूलचे शिक्षण झाले. कर्नाटक लिंगायत एज्युकेशन सोसायटीमधून मॅट्रिक पास झालो. वाचनाचेही संस्कार होऊ लागले. 'जीवन ग्रंथ भांडार' या पुस्तक दुकानात मी रोज जायचो. श्यामची आई मी इथेच वाचले. राष्ट्र सेवा दलाची शाखा सुरू झाली. घरोघरी फिरून तरुणांना आम्ही या शाखेवर आणत असू गाणी, बौद्धिके, खो-खो, कबड्डी असे लोक शिक्षण चाले. अनेक सभांना मी हजर राहात असे. राजकीय पिंड तयार होत होता. एका सभेत ब्रिटिश सार्जंट आले. राष्ट्रीय चळवळीत मी प्रथम लाठी खाल्ली. याच काळात माझे वाचन, लेखन, चिंतन, चर्चा चालू होती. बौद्धिक विकास होत होता. दै. सकाळमध्ये माझा एक लेख छापून आला होता. 'प्रवाह' नावाचे हस्तलिखित आम्ही महिन्यात प्रकाशित करत होतो. कार्यकर्ता म्हणून एकदा मला एका भूमिगत कार्यकर्त्याचे खराब झालेले पिस्तूल दुरुस्त करून त्याच्यापर्यंत पोचविण्याची जोखमीची जबाबदारी दिली होती. पोलिसांना गुंगारा देऊन ही कामगिरी यशस्वी केल्यानंतर झालेला आनंद अपूर्व होता. याच काळात बेळगावात प्रभात फेरी, खादी प्रसार हरिजन सेवा, हिंदू-मुसलमान ऐक्य, दारूबंदी अशा कार्यक्रमांत भाग घेत असे.

३) म. गांधींच्या अहिंसा चळवळीने आपण तरुणपणी भारावला होतात. या भारावलेपणात आपण गांधींच्या भेटीसाठी आसुसले होऊन काहीशी आततायी वाटणारी कृती केलीत. तो प्रसंग सांगाल का?

हो सांगतो - १९४५ साली दुसरे महायुद्ध संपले नंतर आपण सेवाग्राममध्ये जावे. आपणाला इंग्रजाची नोकरी करायची नाही. मग शिकायचे कशाला असा विचार करून २७ जानेवारी १९४६ ला मी व माझा मित्र घरी कोणालाही न सांगता वर्ध्याला निघालो. तरुण भारतमध्ये ही बातमीही आली. बेळगाव ते पुणे, पुणे ते मुंबई असा प्रवास केला. वर्धा स्टेशनला आलो. तीन दिवस जेवण, झोप, आंघोळ काहीच धड नाही. पैसे संपत आलेले. मग सेवाग्रामपर्यंत चालत गेलो. गांधीजी तामिळनाडूला गेले होते. पण आश्रमात आमची राहण्याची व्यवस्था झाली. गांधीजी आश्रमात आले. प्रार्थनेच्या आधी आम्हाला जवळ बोलावून घेतले. डोक्यावरून, पाठीवरून हात फिरविला व म्हणाले, 'स्वयंस्फूर्ती'ने तरूण मुले देशकार्यासाठी पुढे येऊ लागली आहेत. याचा अर्थ हा की देशाला लवकरच स्वातंत्र्य मिळणार आहे' हा माझ्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण होता.

४) गोवा मुक्ती आंदोलनातील आपला सहभाग मोठा आहे. गोमंतकच्या मुक्तीसाठी आपण जो सत्याग्रह केलात. त्याविषयी काय सांगाल.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. पण पोर्तुगीज गोवा सोडून गेले नाहीत. पोर्तुगीज  सरकार निष्ठुरपणे वागत असत. त्यामुळे बरेच लोक गोवा सोडून बाहेर पडले. प्रेमा तेंडुलकर आजच्या प्रेमा पुरव व त्यांचे भाऊ काशिनाथ यांना गोव्यातून हद्दपार केले होते. ते खानापूरमध्ये राहात होते. गोवामुक्ती संबंधात मीटिंग, सभा, मोर्चे बेळगावात आम्ही करत असू. मग आम्ही गोवन पीपल्स पार्टीचे कार्यालय स्थापन केले. बेळगाव हे गोवा मुक्ती आंदोलनाचे केंद्र बनत होते. प्रेमा पुरव आमच्या घरी येत. आमच्या घरातीलच एक सदस्य झाल्या. गोवा मुक्ती आंदोलनाचे लोण महाराष्ट्रभर पसरले. गोव्यातील सालाझारची राजवट अरबी समुद्रात बुडविण्याचा दृढ निश्चय करून कामाला लागू या. असे मी एका भाषणात म्हटले होते. १८ मे १९५५ ला ना. ग. गोरेनी गोव्याला जाऊन सत्याग्रह केला. इतर सत्याग्रही काळोखाचा आधार घेऊन गोवा हद्दीत प्रवेश करीत. त्यांना आम्ही मदत करायचो. बेळगावात त्यांची व्यवस्था करायचो, पोर्तुगीज पोलीस सत्याग्रही गोवा हद्दीत सापडला तर खूप मारहाण करून भारताच्या हद्दीत फेकून देत. दोन सत्याग्रही पोलिसी गोळीबारात बळीही पडले. देशातले केंद्र सरकार व मुंबईचे राज्य सरकार गोवा मुक्ती संग्रामाला साथ देत नव्हते. १५ ऑगस्ट १९५५ ला सत्याग्रह करायचे ठरले. ज्याला मुंबई राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी विरोध केला तरीही लोक गोव्यात पोहोचले. पोर्तुगीजांनी अमानुष गोळीबार केला. १९ डिसेंबर १९६१ ला गोवामुक्त झाला. भारतीय सैन्याने सुरू केलेली ऑपरेशन विजय ही मोहीम यशस्वी झाली.

६) बेळगाव महाराष्ट्राचे की कर्नाटकाचे हा जुना वाद आजही चालू आहे. भाषावार प्रांतरचनेची मागणी देशभर वाढत  होती. आंध्र व तामिळनाडूचे प्रश्न सुटले. मुंबई वेगळी न करता महाराष्ट्राची राजधानी झाली. पण बेळगाव महाराष्ट्रात यावे म्हणून आपण अविरत प्रयत्न केले. ह्या प्रयत्नाविषयी सांगाच. पण हा प्रश्न मार्गी का लागला नाही असे तुम्हाला वाटते.

खूप जुना वाद आहे. बेळगाव नगरपालिकेचे उद्‌घाटन करताना कोनशिलेवर मजकूर मराठीत असावा की कन्नडमध्ये यावरून उद्‌घाटन दोन वेळा रहित झाले. शेवटी मंत्री महोदयांनी मजकूर इंग्रजीत करण्याचा आदेश दिला. बेळगाव नगरपालिकेच्या मार्केटवर मराठी फलक पाहिजे, अशी आमची मागणी होती. सरकारने या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी फाजल अली कमिशन नेमले. २० जून १९५४ ला कमिशन बेळगावात आले. पण वातावरण इतके तापले की १४४ कलम पुकारण्यात आले. नगरपालिकेने त्याच दिवशी एक सभा बोलवून ठराव घेतला. ३६ सभासद हजर होते. २८ जणांनी बेळगाव शहराचा समावेश महाराष्ट्रात करावा असे मत दिले. १८ नोव्हेंबर १९५५ ला मुंबईत आम्ही सत्याग्रह केला. अनेक नेत्यांबरोबर मलाही अटक झाली. जेलमध्ये जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. इथे मला सेनापती बापट भेटले. दुसऱ्या दिवशी जामिनावर सुटका झाली. या सत्याग्रहाबरोबरच संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, खानापूरमधील शेतकरी चळवळ, बेळगावातील कामगार चळवळ ही कामे चालूच होती. सामाजिक चळवळ व राजकीय चळवळ हातात हात घालूनच पुढे नेणे आवश्यक आहे असे मला वाटते. १६ जानेवारी १९५६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी निवाडा जाहीर केला. विदर्भासह महाराष्ट्र आणि मुंबई अशी त्रिराज्य योजना जाहीर केली. बेळगाव, कारवार, बिदर, भालकी महाराष्ट्रातून काढून म्हैसूर राज्यात घालण्यात आले. आंदोलन पेटले. गोळीबार झाला. निदर्शने, घोषणा, लाठीमार, जाहीर सभा घेऊन मी घरी आलो. तर पोलीस माझ्या मागावर आलेच. मला अटक झाली. सत्याग्रह करून तुरुंगात येणाऱ्याची संख्या वाढू लागली. मला नाशिकच्या जेलमध्ये पाठविले. नाना पाटील ह्या जेलमध्ये होते. मी त्यांना हिंदी शिकवत असे. मुंबई हायकोर्टात खटला चालला. हायकोर्टाने आमची अटक कायम केली. मग आम्ही सप्रीम कोर्टात गेलो. दिल्लीच्या सुप्रीम कोर्टात आम्ही आमचे निवेदन मराठीतच मांडू असे सांगितले. दुसऱ्या दिवशी दुभाषा बोलवायचे ठरले. दुभाषाची वाट बघत आम्ही दिवस कंठत होतो. पण १२ ऑक्टोबर १९५६ ला आमच्या सुटकेचे आदेश आले. १९५६ चे आंदोलन पर्व संपलं.

७) तुम्ही एक चांगले वाचक व लेखकही आहात. आजपर्यंत तुमची १६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. लोकवाङ्मयसारख्या प्रकाशकांनी ती प्रकाशित केली आहेत. तुमचा पहिला लेख सकाळमध्ये आला. त्यानंतर वृत्तपत्रीय लेखनही विपुल केले आहे. स्वत:चे साप्ताहिकही २० वर्षे चालविलेत. कार्यकर्ता, सत्याग्रही समाजकारणी, राजकारणी व साहित्यिक यामध्ये क्रम लावायचा झाला तर अग्रक्रम कशाला द्याल, तुमचा साहित्यिक प्रवासही सांगा.

माझे सारे लेखन चळवळ त्यासंबंधी व त्या अनुषंगाने आहे. १५ ऑगस्ट १९५९ साली हेमंत मासिकाचा पहिला अंक प्रकाशित केला. अनेक मोठमोठे कवी, लेखक यात लिहित असत. ५०० प्रतीवरून आमचा खप १००० प्रतीवर गेला. दर्जेदार मासिक असा लौकिक याला प्राप्त झाला. सार्वजनिक वाचनालयाचा अध्यक्ष म्हणूनही काम केले. नवी पुस्तके आवडीने वाचतो. ७३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात माझा साहित्यिक म्हणून सत्कार झाला होता. सीमा प्रश्नावरील परिसंवादात भागही घेतला होता. १९६१साली ''असा आहे गोवा'' या नावाची पुस्तिका मी लिहिली. साम्यवादी या नावाने साप्ताहिकही सुरू केले. वार्षिक वर्गणी दहा रुपये होती. साठ सालानंतरची जी लेखन चळवळ महाराष्ट्रात पुढे आली असे अनेक कवी व लेखकांनी यामध्ये लिहिले आहे. ज्येष्ठ लेखक प्रा. नेरुरकरांची खूप मदत या कामात झाली. माझ्या रशिया दौऱ्यानंतर मी **'गोठलेली धरती व पेटलेली मने'** हे पुस्तक लिहिले. संत साहित्याची मला खूप आवड आहे. **'बसवेश्वर ते ज्ञानेश्वर'** या माझ्या पुस्तकाच्या नऊ हजार प्रती खपल्या. **आंबेडकरावरील माझे पुस्तकही** सर्वांना खूप आवडले. माझा सामाजिक कामाला अग्रक्रम असेल. पण मला उपजतच लेखन करण्याची आवड होती.

८) अन्नपूर्णा परिवाराशी असलेला आपला ऋणानुबंध ऐकायला आम्हा सर्वांना आवडेल.

गोवा मुक्ती संग्रामात प्रेमा पुरव व त्यांचे भाऊ यांना हद्दपार केल्यानंतर ते खानापूरला राहायला आले. मिरजकरांनी या दोघांची ओळख करून दिली. प्रेमा पुरव चौथीत शिकत होत्या. त्या वेळी खानापूर गावात महिला मंडळ स्थापन करून महिलांना प्रेमा पुरव यानी एकत्र केले. प्रेमा पुरव धीट होत्या. आघाडीवर राहून काम करायच्या बेळगावात आल्या की आमच्या घरी यायच्या, असा ऋणानुबंध वाढला. प्रेमा तेंडुलकर नंतर प्रेमा पुरव झाल्या व मुंबईत आल्या. अन्नपूर्णा महिला मंडळ स्थापन केले. गिरणी कामगार संपात अनेक महिलांना काम मिळाले. कॉ. नरेंद्र शांताराम तथा दादा पूरव हे कम्युनिस्ट चळवळीतील एक महत्त्वाचे नेते, बँकिंग क्षेत्राचा अभ्यास व राजकारणाचे आकलन चांगले होते. बँक क्षेत्रात त्यांनी कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण केली होती. १८ ऑगस्ट १९८२ ला

दादा पुरव  अकस्मात गेले. पण मे मध्ये ते एका अधिवेशनाला आले होते. तो काळ आम्ही खूप आनंदात घालवला. महिलांना संघटित करून त्यांना राष्ट्रीयीकृत बँकांतर्फे कर्ज मिळवून देण्याचे काम प्रेमाताईंनी मुंबईत सुरू केले. दादा पुरव व मी दोघांनीही या कामाला पाठिंबा दिला व भागही घेतला. अन्नपूर्णा महिला मंडळाच्या वाटचालीचा मी एक जवळचा साक्षीदार आहे.

आपला कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता म्हणून प्रवास कसा झाला. आज घडीला मागे वळून बघताना काय वाटते. आजच्या पिढीला काय सांगावेसे वाटते.

राजकीय, सामाजिक जीवनात स्वत:ला झोकून देऊन काम केले. १९४८ साली पक्षाचा सभासद झालो. १९५३ साली जिल्हा समितीचा चिटणीस झालो. १९६१साली राज्य समितीवर निवडला गेलो व १९८४ साली राष्ट्रीय समितीवर निवडला गेलो व जबाबदारी वाढत गेली. कार्यातील सातत्य व श्रमिकांशी बांधिलकी मला महत्त्वाची वाटते. पक्षाकडे अन्यायाविरोधी लढण्याचे व निरनिराळ्या समाजांना एकत्र आणण्याचे माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. राजकीय लढे लढवताना जी माणसे आपण जोडतो त्यांना कायमस्वरूपी कार्यक्रम दिला पाहिजे. विधायक कामासाठी पक्षाने एक वेगळी यंत्रणा उभी केली पाहिजे. ९ फेब्रुवारी २००३ ला पंचाहत्तर वर्षात पदार्पण केले. मागे वळून पाहताना मी खूप समाधानी आहे. विद्यार्थी दशेत स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कम्युनिस्ट चळवळीत विचारपूर्वक निर्णय घेऊन आलो. माझ्या बरोबर आज माझी मुलेही कम्युनिस्ट चळवळीत आली. खासगी जीवन व सार्वजनिक जीवन मी वेगळे केले नाही. जीवन पारदर्शी राहील याची सदैव काळजी घेत आहे. आजही माझ्याभोवती सतत माणसे असतात. जोडलेली माणसे हेच माझे खरे धन आहे. पुनर्जन्मावर विश्वास नाही. पण पुन्हा जन्म झाला तर याच वाटेने जायला आवडेल.

आजच्या पिढीला मला सांगावेसे वाटते की, त्यांनी आत्मकेंद्रित होवू नये. स्वत:पुरते पाहणे आज वाढले आहे. आपण एक समाज आहोत. आपली एक सार्वजनिक जबाबदारी आहे. जगात काय चालले आहे हेही समजले पाहिजे. कार्यकारणभावाने विचार करण्याची सवय तरुण पिढीनी लावून घेतली पाहिजे. आज समाजात अंधश्रद्धा वाढत आहे. १२५ कोटी लोकसंख्येत ५० कोटी निरक्षर आहेत. १०० टक्के साक्षरता झाली पाहिजे. मी कामगार युनियनचा अध्यक्ष होतो. तेव्हा हाथी गोल्ड माइन्समधील कामगारांनी साक्षर व्हावे यासाठी प्रयत्न केले होते.

❐

---

मुलगी जन्माला येणे म्हणजे बंधने आली. मुलीला सर्व प्रकारची बंधने ही जन्मल्यापासून असतात तर लग्न झाल्यानंतरही तीच बंधने लागू असतात. त्या महिलांना स्वातंत्र्य आहेच कुठे? चूल आणि मूल या चक्रात महिला एकदम अडकून गेली आहे. माझी सुद्धा तीच परिस्थिती आहे. मला पण आयुष्यात स्वातंत्र्य हवे आहे. मी मुलांचे संगोपन एकटीनेच का करावे इतर कुटुंबानी पण लक्ष द्यावे एकटीनेच का सर्व कामाकडे पाहावे. इतर कुटुंबातील सदस्यांनी पण मला मदत करावी. एक महिला म्हणून मला पुरुषांसारखे स्वातंत्र्य हवे होते. कारण एक महिला असून जे काही मी माझ्या आयुष्यात सहन केले आहे ते मी व्यक्त करू शकत नाही पण खरोखरच जर मी स्वतंत्र असती तर नक्कीच स्वत:साठी व समाजासाठी काही करू इच्छित आहे. मेधाताईंना बघितल्यावर खूप अभिमान वाटतो कारण अशा महिला खूप कमी असतात आणि मला पण त्यांना बघितल्यावर खूप-खूप स्फूर्ती मिळते आणि खरोखर खूप काही करावे असे वाटते. पण घरात सर्व बंधनामुळे खूप अडकून गेल्यासारखे वाटते. पण हे बंधन कधी कधी पण छान वाटते. कारण त्यात पण काही अशा गोष्टी असतात की मन रमून जाते आणि मुलांना खूप शिक्षण देऊन त्यांना समाजातील एक चांगला नागरिक बनवण्यासाठी प्रयत्न करते आणि मुलींना माझ्यापेक्षा कमी बंधने आहेत तर त्यांना समाजात वावरण्यासाठी खूप चांगले संस्कार दिले आहेत. त्यामुळे त्यांना स्वत:ची समाजात मदत करण्याची इच्छा वाढते व त्या नेहमी दुसऱ्यांना आपल्या परिस्थितीप्रमाणे मदत करतात.

**■ निशा साळवी, ०**

कविता

# माझ्या माणसांनो,



माझ्या माणसांनो,

जन्माला आलात ना
तेव्हा कुणाच्याच छातीवर जानवे नव्हते
कुणाच्याच मनगटात कडे नव्हते
कुणालाच बाप्तिस्मा दिलेला नव्हता
कुणाचीच सुन्ता केलेली नव्हती
कुणाच्याच बगलेत पैशाच्या पिशव्या नव्हत्या
कुणाच्याच कुणाच्या काखेत भिकेची झोळी नव्हती
जन्माला येताना तुम्ही केलेल्या आकांताची
भाषा तर एकच होती...!

माझ्या माणसांनो,
जात, धर्म, भाषा, भेद विसरून
जेव्हा तुम्ही प्रगतीची वाटचाल करत असाल
तेव्हा तुम्हाला भेटतील
मलाही भेटलेल्या त्याच शक्ती...
परंपरांची झूल पांघरणाऱ्या
भेदभावांची भूल घालणाऱ्या
आणि तुम्ही सावध नसाल
तर शत्रूऐवजी एकमेकांची कत्तल कराल

माझ्या माणसांनो,
विचारशक्तीला रजा देऊ नका
सरकारांचे गुलाम होऊ नका
तुमच्यातील माणसाचा खून
सैतानालाच काय
पण तुमच्या देवालाही करू देऊ
नका!

**-जयंत गडकरी**

# आमचा 'पैसा' आमचे 'नियोजन'

**■ हेमराज पाटील**

जगात झपाट्याने बदल होताना आपण पाहत आहोत, सोबतच विज्ञानाच्या आधारे तंत्रज्ञान बदलत आहे. ज्याचा समाजकारण व अर्थकारण यावर परिणाम होत आहे. सोबत, दर २० ते २५ वर्षांनी होणारे बदल आता पाच वर्षांनीच होत आहेत हेही विसरून चालणार नाही. ही परिस्थिती समतोल ठेवण्यासाठी, आपल्या आर्थिक नियोजनासाठीची देवाण-घेवाण, सर्वसमावेशक धोरण राबवण्याचे निर्णय यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी देशात न बदलणाऱ्या शासनव्यवस्था निर्माण करण्यात आल्या, पण वरील बदलांपासून या शासनव्यवस्था दूर कशा राहणार?.

आपण पाहतच आहोत, राज्यात गेल्या काही वर्षांपासून वेगवेगळ्या लोकोपयोगी योजना येत आहेत. त्यांतून लोकांना आपल्या उपयोगाच्या योजनेतून लाभ मिळवण्यासाठी स्वत:हून बराच खटाटोप करावा लागतोय; पुरेपूर सेवा देण्यासाठी प्रयत्न करूनदेखील शासकीय विभागांना पुरेसा निधी उपलब्ध होत नाही; कारण, सर्वच क्षेत्रांमध्ये उदा. राजकीय क्षेत्र, खासगी क्षेत्र, सरकारी सेवा देणारे क्षेत्र इत्यादींमध्ये गरजा आणि मागण्या बदललेल्या आहेत. त्यात सर्वसाधारण माणसाला या बदलांशी जमवून घेण्यास वेळ लागतो. तसा व्यवस्थांनाही लागतो. दुर्दैवाने आपल्याकडच्या व्यवस्थांना जरा जास्तच वेळ लागण्याचा आजार जडला आहे. या आजाराची वेळेत दखल न घेतल्याचा परिणाम जनतेच्या काही मूलभूत प्रश्नांवर होतो. या सर्व बाबींकडे बारकाईने बघितल्यास सुई 'केंद्रित' नियोजनाकडे जाते. म्हणजे असे नियोजन ज्यात कुठेच 'विकेंद्रित' किंवा 'लोकसहभाग' नाही.

**विकेंद्रित नियोजनाची व्याख्या –** 'लोकसहभागातून नियोजन म्हणजे स्थानिक पातळीवर / गावात कमीत कमी वेळात, पैशात ध्येय साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून गावातील लोक व सरकारी कर्मचारी यांनी माहिती मिळवणे व त्या माहितीच्या आधारे एक सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करणे.' ज्याला शासकीय भाषेत पी.आय.पी. (Program Implementation Plan) म्हटले गेले आहे. ज्यामध्ये जनतेचा कररूपी पैसा शासन दरबारी महसुलात जमा होतो. त्यातूनच, शासनामार्फत सार्वजनिक हिताच्या सेवांवर खर्च नियोजित केला जातो. तर नेमक्या कोणत्या गरजा या सार्वजनिक हिताच्या आहेत, ज्यावर खर्चाचे नियोजन करणे अपेक्षित आहे हेही लोकांनीच ठरवले तर, 'आमचा पैसा आमचे नियोजन' यास न्याय मिळतो.

'राष्ट्रीय आरोग्य अभियान' अंतर्गत 'विकेंद्रित नियोजन' वाढविण्याच्या दृष्टीने दर वर्षी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस पी.आय.पी. प्रक्रिया पार पाडून आरोग्यसेवांचा नियोजन कृती आराखडा तयार केला जातो. **मात्र त्यात, प्रत्यक्ष गावाच्या गरजांनुसार, आरोग्य केंद्रात लोकांच्या दृष्टीने काय गरजेचे आहे, शासकीय स्तरावर नेमक्या कोणत्या योजना रुग्णांसाठी अंमलात आणल्या जाव्यात याचे लोक सहभागाने नियोजन होत नाही. परिणामी, पी.आय.पी. एक तांत्रिक पद्धतीने आणि चालू वर्षाच्या आकडेवारीनुसार तयार करून राज्यस्तरावर पाठवला जातो.**

ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, २०१३-१४ या आर्थिक वर्षात, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात 'लोकाधारित/लोकसहभागातून नियोजन' या अभिनव प्रक्रियेला गडचिरोली जिल्ह्यात सुरुवात झाली.

ज्यामध्ये लोकांच्या मागण्यांचे व गरजांचे रूपांतर बजेटमध्ये केले गेले. जी पुढे जाऊन महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमध्ये 'विकेंद्रित नियोजन, गडचिरोलीचा पी.आय.पी. पॅटर्न, गरजा आधारित नियोजन या वेगवेगळ्या नावांनी ओळखली गेली.

गडचिरोली जिल्ह्याचा अनुभव आणि गेल्या दोन वर्षांपासून पी.आय.पी. तयार करण्याची प्रक्रिया लक्षात घेता, यावर्षी 'लोक सहभागाने गाव गरजा शोध कार्यक्रम' असा एक वेगळा आयाम या प्रक्रियेस मिळाला. १४ जिल्ह्यांतील ३० तालुक्यांमध्ये ९० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८० गावांमध्ये विकेंद्रित नियोजन प्रक्रिया राबवण्याचे नियोजन 'राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र' आणि 'साथी' संस्था यांच्या मार्फत झाले.

आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेतील संस्था-संघटनांमार्फत विकेंद्रित नियोजन प्रक्रिया राबवली गेली. मुख्यत: लोकसहभागी प्रक्रियेला केंद्रस्थानी ठेवून स्थानिक पातळीवरील निधींवर आणि त्या निधींच्या नियोजनावर जास्त भर दिला जावा. या हेतूने राज्य, जिल्हा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या. ज्यामध्ये प्रक्रियेतील गावांमधून गाव आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता व पोषण समिती, सरपंच, आरोग्य सेवक-सेविका, आशा आणि संस्थांचे कार्यकर्ते यांना आवर्जून सहभागी करण्यात आले.

### असे झाले लोकसहभागी नियोजन...!

प्रशिक्षण कार्यशाळांनंतर, गावांमध्ये **'गाव गरजा शोध कार्यक्रम'** आणि पी.आय.पी. प्रक्रियेविषयी 'जाणीवजागृती' करण्यात आली. त्यात गावातील शासकीय सेवांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी पी.आर.ए. (Participatory Rural Appraisal) लोकांच्या सहभागाने सद्यःस्थितीचे मूल्यांकन व अवलोकन या पद्धतीचा वापर केला गेला. शिवार/गाव फेरी केली गेली; स्थानिक संसाधनांचा व उपलब्ध निधींचा वापर होऊ शकतो म्हणून गावात नकाशे काढले गेले; गाव बैठक; शाळा, अंगणवाडी सरकारी कार्यालय याची पाहणी केली; गावातील पाण्याचे स्रोत- हातपंप, विहीर, पाणीपुरवठा पाईप लाइन, नाले इत्यादी ठिकाणी गावातील सक्रिय लोक, आरोग्य कर्मचारी, संस्थेचे कार्यकर्ते, गाव समितीचे सदस्य, ग्राम पंचायत सदस्य इत्यादी लोकांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या; काही ठिकाणी जिल्हा परिषद सदस्य आणि गटविकास अधिकारीदेखील गाव बैठकीला उपस्थित राहिले. गाव बैठकांमध्ये गावातील महिला-पुरुषांनी सक्रिय सहभाग नोंदवून खूप वेगळ्या प्रकारच्या गरजा आणि मागण्या उपस्थित केल्या. उदा. आरोग्य सेवेत गाव आणि आरोग्य केंद्रांमध्ये सेवा देण्याबाबत असलेल्या अनियमितता; अंगणवाडीत पौष्टिक आहाराऐवजी पाकीट फूड तेही अपुरे; गावातील पिण्याच्या तसे वापराच्या पाण्याचे नेहमीचे प्रश्न; अंतर्गत गटारी आणि उघड्या गटारी यामुळे होणारे त्रास; इत्यादी बरेच मुद्दे अधिकाऱ्यांसमोर लोकांनी मांडले. रेशनिंग आणि रोजगार याचा परिणाम कुपोषण आणि स्थलांतर यावर होतोय का? असे प्रश्न समोर येऊ लागले.

खरे तर, सुरुवातीला यातून चांगले नियोजन कसे साकारता येईल. याबाबत पूर्ण स्पष्टता येत नव्हती. कृती आराखडा तयार करण्यासाठी आणि अंदाजपत्रक तयार करण्यासाठी गरजांच्या स्वरूपात माहिती लागते तशी माहिती जुळत नव्हती. मात्र, गावातील काही सक्रिय लोक, संस्था-संघटनांचे कार्यकर्ते आणि अधिकारी यांच्या सहयोगाने स्थानिक प्रश्न आणि मागणी यांचे रूपांतर गरजांमध्ये करण्यात आले. त्यानंतर गरजांचे वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यात आले. मुख्यत: स्थानिक निधींमधून मार्गी लागू शकणाऱ्या गरजांवर चर्चा करण्यात आल्या. ज्यामध्ये १४ वा वित्त आयोग, आदिवासी क्षेत्रात पेसा (PESA-Panchayats (Extension to Scheduled Areas) Act-1996) अंतर्गत निधी, जिल्हा नियोजन समितीचा निधी, स्थानिक गाव आरोग्य समितीचा निधी, रुग्ण कल्याण समिती निधी इत्यादी निधींचा वापर करता येऊ शकतो असा विचार केला गेला. त्याप्रमाणे निर्णय घेण्यात आले. काही ठिकाणी सार्वजनिक संडास, गटारी, रस्ते यासारखी कामे गावफेरी दरम्यान अर्धवट राहिल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांना विचारणा करण्यात आली. शिवाय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्तक्षेपामुळे काही काम लगेच सुरू करण्यात आली.

सर्वच गरजा नुसत्या स्थानिक निर्णयांवर सुटणार नाहीत. म्हणून तालुका आणि जिल्हा स्तरावर वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठका लावल्या. त्या-त्या पातळीवर काय करता येऊ शकते याची चर्चा घडवण्यात आली. त्यानुसार काही गरजा नुसत्या एका गावाच्या नाहीत असे पडताळून पूर्ण तालुक्याच्या बाबतीत गरज सोडवण्यासाठी काय नियोजन असू शकते याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सोपवण्याचे ठरवले गेले. आरोग्य सेवांबाबत संस्थांगत पातळीवर गरज सोडवणे शक्य नसेल तर राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्फत होत असलेल्या पी.आय.पी.मध्ये काही प्रस्ताव जिल्हा स्तरावरून पाठवले गेले. अर्थात, सर्व ठिकाणी प्रस्ताव तयार करण्याच्या प्रक्रियेत तांत्रिक सहकार्य हे आरोग्य सेवा यंत्रणेतील लोकांनीच केले.

प्रायोगिक तत्त्वावर कुठल्याही एका सार्वजनिक क्षेत्रात 'लोकसहभागी विकेंद्रित नियोजन प्रक्रिया राबवण्यात आलेल्या या प्रक्रियेचा सकारात्मक अनुभव लक्षात घेता, इतर सामाजिक सेवांमध्ये देखील विकेंद्रित नियोजनाची प्रक्रिया राबवायला हरकत नाही. त्यासाठी सुरुवात म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अखत्यारीत येणाऱ्या सामाजिक सेवांचे विकेंद्रित नियोजन प्रायोगिक तत्त्वावर सुरू करायला हवे. त्यामध्ये शिक्षण, रोजगार हमी योजना, अंगणवाडी सारख्या सामाजिक सेवा ज्या आरोग्याशी जोडलेल्या आहेत त्यांचा समावेश नक्कीच होऊ शकेल. ❐

# जन्माला न आलेली ''जिओ''

■ **रामचंद्र गुहा**

अशी कल्पना करा की, एका श्रीमंत व्यक्तीला पेट्रोलियम उत्पादने तयार करणाऱ्या कंपनीमध्ये गुंतवणूक करायची आहे. त्याच्यासमोर दोन पर्याय आहेत; एक तर त्याने त्याचे पैसे अशा कंपनीमध्ये गुंतवावे ज्यांची प्रवर्तक रिलायन्स ही कंपनी आहे, अथवा अशा कंपनीमध्ये गुंतवावे जी एका अभ्यासकांच्या चमूने प्रवर्तित केली आहे आणि या कंपनीच्या प्रमुखपदी शिकागो विद्यापीठात प्राध्यापक असलेले रघुराम राजन आहेत. या दोन पर्यायांमधून एकाची निवड करण्यासाठी खूप विचार करण्याची गरज नाही. कोणीही चलाख गुंतवणूकदार या दोन पर्यायांमधून प्रत्येक वेळी बिनदिक्कतपणे रिलायन्सची निवड करेल.

आता खरी परिस्थिती विचारात घ्या. भारत सरकारला जागतिक दर्जाच्या बनण्याची क्षमता असलेल्या शैक्षणिक संस्था निवडून त्यांची दिल्लीमधील सरकारी बाबूच्या लालफितीच्या कारभारापासून सुटका करायची आहे. समोर दोन पर्याय आहेत. एक पर्याय रिलायन्सने प्रवर्तित केलेल्या विद्यापीठाचा आहे आणि दुसरा पर्याय शिकागो विद्यापीठातील प्राध्यापक रघुराम राजन मार्गदर्शक असलेल्या विद्यापीठाचा आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण आपल्या सरकारने चक्क पहिल्या पर्यायायाची निवड केली आहे!

या निर्णयाची आपण चिकित्सा करण्यापूर्वी मला यामागील पार्श्वभूमी सांगायची आहे. गेल्या वर्षी भारत सरकारने एका स्पर्धेची घोषणा केली होती. त्या स्पर्धेच्या माध्यमातून वीस सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्थांची (दहा सरकारी आणि दहा खाजगी) निवड केली जाणार होती. यासाठी जे अर्ज मागवले गेले त्याला संपूर्ण भारतातून उत्तम प्रतिसाद लाभला. यामधील चाळीस संस्था निवडून त्यांची एक यादी केली गेली आणि या संस्थांच्या प्रतिनिधींना एक निवृत्त आय. ए. एस. अधिकारी अध्यक्ष असलेल्या समितीसमोर सादरीकरणासाठी बोलावले गेले.

या मुलाखती एप्रिल महिन्याच्या सुरूवातीला घेण्यात आल्या. ज्या संस्थांना या यादीमधून वगळण्यात आले होते, त्यांनी आपल्याला विनाकारण डावलण्यात येत आहे अशी तक्रार केली होती. त्यामुळे मग त्यांच्यादेखील मुलाखती घेण्यात आल्या. यानंतर अनेक महिने असेच गेले. सरकारने यासंबंधी कोणताही निर्णय अर्ज केलेल्या संस्थाना अथवा जनतेला कळवला नाही. मागच्या आठवड्यात अचानक सरकारने प्रस्तावित वीस संस्थांऐवजी फक्त सहा संस्थांची निवड केल्याचे जाहीर केले.

निवड केलेल्या सहा शैक्षणिक संस्थांपैकी बेंगळुरू येथील 'इंडियन इन्सिट्यूट ऑफ सायन्स', आयआयटी दिल्ली आणि आयआयटी मुंबई या तीन संस्था सार्वजनिक क्षेत्रातल्या आहेत. उर्वरित तीन संस्था या खाजगी क्षेत्रातल्या असून त्यापैकी बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी अँड सायन्स (BITS) आणि मणिपाल ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन या दीर्घकाळापासून कार्यरत आहेत.

प्रस्तुत लेखकाला या पाचही संस्था चांगल्या प्रकारे माहित आहेत. मी या पाचही संस्थांमध्ये व्याख्याने दिली असून या पाचही संस्थांमध्ये असलेल्या प्राध्यापकांबरोबर काम केलेले आहे. या संस्था देशातल्या प्रतिष्ठित आणि दर्जेदार संस्था असून हे प्राध्यापकही त्यांच्या कामासाठी ओळखले जातात. एक वेळ आपण असे म्हणू शकतो की, आयआयटी दिल्लीऐवजी आयआयटी मद्रासची निवड करावयास हवी होती, किंवा समाजशास्त्र आणि विज्ञान तंत्रज्ञान या दोन्ही क्षेत्रांमध्ये उच्च दर्जाचे संशोधन करण्यासंबंधी पूर्वीपासून

नावलौकिक असलेल्या हैदराबाद सेंट्रल युनिव्हर्सिटीसारख्या संस्थेची निवड व्हायला हवी होती असे म्हणता येईल. याखेरीज, बिट्स आणि मणिपाल या दोन्ही संस्थांनी हजारोंच्या संख्येने उत्कृष्ट विद्यार्थी तयार केले असले तरी मुळात या संशोधनाधारित संस्था नसून मुख्यत: शैक्षणिक संस्था आहेत. या संस्थेमध्ये केल्या जाणाऱ्या संशोधनाचे प्रमाण कधीच जागतिक मानांकनाच्या जवळ गेलेले नाही आणि तसे जाण्याची शक्यतादेखील नाही.

इतर ज्या खाजगी संस्था निवडसमितीने शॉर्ट-लिस्ट केल्या होत्या, त्यात अशोका, जिंदाल, अझीम प्रेमजी आणि अहमदाबाद या चार विद्यापीठांचा समावेश आहे. या विद्यापीठांशीदेखील माझा कामाच्या निमित्ताने संवाद आणि परिचय झालेला आहे. यातील प्रत्येकाच्या काही जमेच्या बाजू आहेत. जिंदालकडे सर्वोत्तम पायाभूत सुविधा आहेत, अशोकामध्ये सर्वोत्तम सामाजिकशास्त्र विभाग आहे, अझीम प्रेमजी विद्यापीठामध्ये प्रशासन आणि धोरणाविषयक उत्तम संशोधन केले जाते, तर अहमदाबाद विध्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी नावीन्यपूर्ण असा आंतर - विद्याशाखीय दृष्टिकोन ठेवला जातो. निवडसमितीने जर या संस्थांच्या भूतकाळातील अध्यापनाच्या दर्जापेक्षा भविष्यातील संशोधन क्षमता या निकषावर जास्त लक्ष केंद्रित केले असते तर, बिट्स आणि मणिपाल या संस्थांपेक्षा वरील चार विद्यापीठांमधील कोणतीही दोन विद्यापीठे निवडायला हवी होती.

यातील सर्वाधिक वाद्रगस्त अशी निवड ही मात्र सहाव्या म्हणजे अजून ज्याची स्थापनादेखील झालेली नाही, अशा जिओ इन्स्टिट्यूटची आहे. ही निवड वादग्रस्त होण्याचे कारण म्हणजे, या संस्थेच्या प्रवर्तकांकडे शैक्षणिक संस्था चालवण्याचा कोणताही अनुभव नाही. याहून महत्त्वाचे म्हणजे अशोका, जिंदाल, अझीम प्रेमजी इत्यादी विद्यापीठांच्या तुलनेत जिओ इन्स्टिट्यूट ही आजच्या घडीला फक्त एक कल्पना आहे, तिच्याकडे कोणत्याही प्रकारची इमारत, शिक्षकवृंद किंवा विद्यार्थी नाहीत.

निवडलेल्या सहा संस्थांमध्ये जिओ इन्स्टिट्यूटचे नाव येताच समाज माध्यमांमध्ये याविषयी लागलीच टीकेची झोड उठली. याला उत्तर म्हणून मनुष्यबळ विकास मंत्रालयाने स्पष्टीकरण दिले की, निवडसमितीला ''ग्रीनफिल्ड प्रकल्प'' (म्हणजे ज्यांचे कोणतेही काम सुरू झालेले नाही, असे) देखील विचारात घेण्यास सांगितले गेले होते. तर मग अशावेळी प्रश्न येतो की, मग फक्त जिओ इन्स्टिट्यूटच का निवडण्यात आली? अशाच प्रकारे पूर्ण न झालेली पण अधिक जास्त विश्वासार्ह व्यक्तींनी प्रवर्तित केलेली संस्था का निवडण्यात येऊ नये? उदा. निवडसमितीने चेन्नईजवळ तयार होत असलेल्या आणि जिओ इन्स्टिट्यूटपेक्षा तयारीच्या अधिक पुढच्या टप्प्यावर असलेल्या क्रिआ (KREA) या विद्यापीठाची निवड का करू नये? क्रिआ विद्यापीठाच्या प्रशासन मंडळावर आनंद महिंद्रा, किरण मुजुमदार - शॉ, अनु आगा आणि एन. वाघुल आशा नामवंत व्यक्ती आहेत. आणि विद्यापीठाच्या ॲकेडेमिक कौन्सिलचे अध्यक्ष रघुराम राजन असून, प्रतिभावन इतिहासकार श्रीनाथ राघवन, शास्त्रीय संगीतकार टी. एम. कृष्णा आणि महान गणितज्ज्ञ मंजुळ भार्गव यांसारखे सदस्य आहेत.

मी गेल्या चाळीस वर्षांहून अधिक काळ भारतातील शैक्षणिक आणि संशोधन जगतात एक विद्यार्थी व एक संशोधक म्हणून सक्रिय आहे. त्या अनुभवामुळे माझे असे मत आहे की, अशोका, अझीम प्रेमजी आणि अहमदाबाद विद्यापीठ यांपैकी दोघांची निवड या सहा संस्थांच्या यादीमध्ये करावयास हवी होती. कारण या तिन्ही विद्यापीठांनी आपल्या स्थापनेमागील संकल्पना प्रत्यक्षात कशी आणता येऊ शकेल याचा पुरावा दिला आहे. या संस्था यापूर्वीच कार्यरत झाल्या असून आणि त्यांनी भारत तसेच जगभरातील उत्कृष्ट प्राध्यापक मंडळींना आपल्याकडे येऊन पूर्णवेळ अध्यापन करावे यासाठी आकर्षित केले आहे. या विद्यापीठांमध्ये विविध अभ्यासक्रमांच्या अध्यापनाची प्रक्रियादेखील सुरू झाली आहे. ही विद्यापीठे जागतिक दर्जाची होण्याची क्षमता त्यांच्याकडे नक्कीच आहे. कदाचित अजून जास्त सक्षम आणि स्वतंत्रपणे विचार करणारी निवडसमिती असती तर त्यांनी या विद्यापीठांच्या क्षमतेवर नक्कीच विश्वास ठेवला असता.

जर समजा युक्तिवाद करावयाचाच असेल तर, सरकारला एक ''ग्रीनफिल्ड प्रकल्प'' निवडायचा होता, तर मग इतर पर्यायांकडे दुर्लक्ष करून जिओ इन्स्टिट्यूटलाच का निवडले गेले? क्रिआ (KREA) विद्यापीठाच्या अधिक प्रभावी असलेल्या क्षमतेची व्यवस्थित शहानिशा केली गेली होती का?

मी हा स्तंभ लिहीत आहे तेव्हा इतर अर्जदारांना डावलून जिवलून जिओ इन्स्टिट्यूटची का निवड केली गेली असावी यासंबंधित उलट-सुलट चर्चांना समाज माध्यमांमध्ये ऊत आला आहे. निवडसमितीवर आणल्या गेलेल्या अतिरिक्त दबावाविषयी (किंवा तसे नसेल देखील) लोकं आपापले अंदाज बांधत आहेत. या अनुमानांवर आणखी काही पुस्ती जोडण्यासाठी मी इच्छुक नाही. पण मी पुन्हा एकदा ठामपणे हेच सांगू इच्छितो की, जिओ इन्स्टिट्यूटची एकूण निवड आश्चर्यचकित करणारी आहे. त्यामुळेच जर माझ्याकडे अतिरिक्त पैसे असते आणि हे पैसे गुंतवण्यासाठी रिलायन्स प्रवर्तित पेट्रोलियम कंपनी आणि प्रा. रघुराम राजन यांनी प्रवर्तित केलेली पेट्रोलियम कंपनी असे दोन पर्याय माझ्यासमोर असतील तर मला माहीत आहे की, मी माझे पैसे कुणाकडे गुंतवावे. पण प्रश्न असा आहे की, या 'तज्ञ' म्हणवल्या जाणाऱ्या निवडसमितीने नफा कमावण्याचा उद्देश असलेले कारखाने आणि एक जागतिक दर्जाचे विद्यापीठ यात काय मूलभूत फरक असतो. याचा विचार केला होता काय?

**( अनुवाद : साजिद इनामदार, रामचंद्र गुहा, बेंगळुरु)**

**(साप्ताहिक साधना - शनिवार २८ जुलै २०१८ यांच्या सौजन्याने)**

❒

# समानतेच्या वाटेवर

■ संतोष भोई

**स्वतंत्र भारतातील महिला व तरुण अजून पारतंत्र्यात राहणाऱ्यांची परिस्थिती**

स्वातंत्र्य हे आजच्या काळात बऱ्यापैकी सर्वांना मिळाले आहे. प्रत्येक क्षेत्रात आज प्रत्येकाला समान संधी दिली जात आहे.

संविधानात भाग - ३ मध्ये मूलभूत हक्क कलम (१२ ते ३५) यातील स्वातंत्र्याचे अधिकार कलम (१९ ते २२) मध्ये व्यक्तीला स्वातंत्र्य दिले जाते. स्वातंत्र्य म्हणजे ''कोणत्याही स्वरूपाचे बंधन नसणे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक या क्षेत्रात पिळवणूक नसणे, समाज व्यवहाराची संधी असणे.'' अशा स्वरूपात आपण स्वातंत्र्याची व्याख्या करू शकतो. परंतु आज प्रत्येक व्यक्ती खरेच स्वतंत्रपणे जगतो का? त्याला जे करण्याची इच्छा होते. ते तो करतो का? असे बरेच प्रश्न एखाद्या व्यक्तीला विचारले गेले तर त्याला विचारलेली प्रश्नांची उत्तरे ती नाही म्हणूनच येतील. कारण आज प्रत्येक व्यक्ती काहिंना काही गुलामगिरीमध्ये जगतो आहे. मानसिक स्वातंत्र्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्वातंत्र्य आज खरेच मिळाली आहेत का? हे प्रत्येक व्यक्तीने आपआपल्या परीने प्रत्येकाला विचारायला हवे की, आपण खरेच या बाबतीत स्वतंत्र आहोत का?

तसेच काय खायचे, काय प्यायचे, कुठलं शिक्षण घ्यायचे, स्वत:च्या आर्थिक विकासासाठी कुठला रस्ता निवडायचा, कपडे कुठले वापरायचे, लग्न कोणाशी करायचे, काय वाचावे हे स्वत:चे ठरवायला तरी आपण खरेच स्वतंत्र आहोत का? आपल्या जीवनात सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपण समाजाने ठरवून दिल्या प्रमाणे आपण आपल्या सवयीचे गुलाम आहोत. हेच नाही तर पूर्वीपासून चालू असणारे धार्मिक सण, उत्सव, सामाजिक रूढी परंपरा त्या खऱ्या आहेत की नाही, हे विचार करण्याचे तरी आपल्याला स्वातंत्र्य आहे का?, आज समाजात बऱ्यापैकी प्रत्येक जाती धर्मात रुढी-परंपरा चालू आहेत. परंतु ते कसे सुरुवात झालेत. त्याचे कारण काय होते? आणि त्याचा काही कायदा आहे का? असे बरेच प्रश्न प्रत्येक व्यक्तीला द्यायला हवे आणि जर एखादा व्यक्तीला प्रश्न पडलेच, तर त्यांना नको ते बोलले जाते, जसे की समाजवादी आहे का, तुला पाप लागेल, तसे असे होईल तसे होईल आणि त्यांचे विचार तिथेच दाबले जातात कारण आज समाजाच्या विरोधात किंवा धार्मिक अंधश्रद्धा, तसेच चुकीच्या रुढी परंपराबद्दल बोलले गेले तर त्याला समाजद्रोही ठरवले जाते आणि वाळीत टाकण्यासारख्या सडलेल्या विचारसरणीसारख्या घटना घडतात. हेच नव्हे तर त्याला वेडा ठरवण्याचा सुद्धा प्रयत्न करतात आणि नको ते अन्याय त्या व्यक्तीला सतत सोसावे लागतात. असो पण हेही तितकेच खरे आहे की ह्या संकटांना जो सामोरे गेला आहे. आज ती प्रत्येक व्यक्ती समाजासाठी ठरले आहेत आणि आपली आदर्श आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तर आजतागायत खूप काही विकासाची वाटचाल झालेली दिसत आहे. गावा-गावात रस्ते, वीज, दळणवळणाची गोष्टी पोहोचल्या आहेत. माणसाचे जीवन जलद व्हायला लागले आहे. कष्टाचे काम कमी आणि यंत्राने माणूस जास्त काम करायला लागला आहे. आता असे कोणते क्षेत्र नाही की, त्यात यंत्राचा उपयोग होत नाही. Modern युगात Modern माणूस जीवन जगत चाललाय ती चांगली बाब आहे. जग बदलतंय तर त्या सोबत आपणही बदलायला हवेच.

परंतु खरा प्रश्न तो नाही. खरे आहे ते स्वातंत्र्य अजूनही कुठे तरी लपलय. भारत स्वातंत्र्यापूर्वी महिलांना असलेली स्वातंत्र्य आणि आता महिलांना असलेले स्वातंत्र्य मात्र फरक तरी जाणवला असला तरी भारत स्वातंत्र्यानंतर महिला सक्षमीकरणासाठी भरपूर कायदे केले गेले. उदा. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ २) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा ३) विशाखा गाइड लाइन ४) बालविवाह प्रतिबंधक कायदा ५) लिंगनिदान प्रतिबंधक कायदा ५) देवदासी प्रतिबंधक कायदा असे कायदे आहेत. कायदे येत राहतील. जात राहतील त्यात नवे नवे बदल सुचविले जातीलही, परंतु समाजाच्या मानसिकतेचा बदल करणारा कायदा होऊ शकतो का? बदल करायचा आहे. तो समाजातील सनातनी लोकांच्या मानसिकतेचा. धार्मिक कर्मकांडात महिलांचे किती शोषण होते हे आपण विचारांती करू शकत नाही. आजही त्याला बळी पडतच आहे. देवी-देव - देवतांवर अवलंबून राहण्याची मानसिकता समाजाची झाली आहे. यात बदल होत नाही. तोपर्यंत समाजाचे नुकसान होतच राहील. काल परवाची गोष्ट देवदर्शनासाठी जात असलेली बस दरीत कोसळली असे किती घटनांमुळे लोक मेलेली आहेत अशा वेळी देवी शक्ती कुठे जाते. असो हा ज्याचा त्याचा श्रद्धेचा विषय परंतु बाबा महाराजांपासून महिलांवरचे होणारे शोषण कधी थांबेल. आसाराम बापूपासून ते आज काल परवा घडणाऱ्या बाबा रहीमपर्यंतच्या गोष्टी आपण चांगल्या अनुभवल्या आहेत.

महिलांवरील अत्याचार ही आजची परिस्थिती नाही पूर्वी घडत असे घटना परंतु ते समोर आले नाहीत आता यायला लागले तर समाज जागा होत चाललेला दिसत आहे परंतु बलात्काराचे आणि अत्याचाराचे प्रमाण काही कमी होताना दिसत नाही आहे. NCRB (National Crime Records Bureau) रिपोर्टनुसार

२०१२ मध्ये रेप केसेस २४,९२३
२०१३ मध्ये रेप केसेस ३३,७०७
२०१४ मध्ये रेप केसेस ३६,७३५
२०१५ मध्ये रेप केसेस ३४,६५१
अशा केसेस घडल्या आहेत.

ज्यावेळेस स्त्री सत्ताक पद्धत होती त्यावेळेस त्या काळात महिलांनी शेतीचा शोध लावला ते बऱ्यापैकी लोकांना माहिती नसेल. भारतातील एकूण शेतकऱ्यांपैकी ६०% शेतकरी या स्त्रिया आहेत. पेरणी असो, नांगरणी खुरपणी असो किंवा ट्रॅक्टरने मळणी - शेतावर स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त काम करतात असे असतानाही या शेतकरी महिलांपैकी केवळ १३% स्त्रियाच जमिनीच्या मालक आहेत.

परंतु हे तितकेच खरे आहे की स्वत:ची क्षमता ओळखण्यासाठी काही संदर्भ द्यावे लागतात तसेच माँसाहेब जिजाऊ, सावित्रीमाई फुले, रमाबाई, गौरी लंकेश यांनी आपले जीवन समाजाचा विरोधात संघर्षमय जीवन जगले आहे परंतु आज आधुनिक काळात काही काही ठिकाणी महिला फक्त हे घर आणि दार या पलीकडे आपल्याला दिसत नाही. समाजाने चौकट राखून दिले आहे की, एका स्त्रीने काय काम करावे, कसे बोलावे, कसे वागावे, कसे विचार असावे. असे कपडे घालावे, कोणाशी बोलावे, कोणाशी नाही बोलावे असे अनेकविध समाजाने स्त्रीवर बंधने लादली आहेत आणि समाजाच्या रूढी परंपरानुसार चालत आलेली महिलांवरील बंधने (गुलामगिरी) आहेत.

अजूनही या सृजनशील समाजात महिला खरेच स्वतंत्र आहेत का? जग बदलत चाललंय परंतु काही ठिकाणी अजूनही मनुस्मृती प्रमाणे लोकांचे विचार सडलेले आहेतच याचा Narrow minded म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

तसेच पती कसलाही असला तरी पती म्हणजे परमेश्वर अशी कन्सेप्ट महिलांमध्ये सजली आहे. असो ही कन्सेप्ट चांगलीही असेल परंतु पुरुषांनाही त्यांना तितकाच (Respect) देणे अपेक्षित आहे. "आजच्या मुली पती परमेश्वर नाही तर, जीवनसाथी शोधत आहेत, त्यांच्यासोबत बरोबरीने असतील, तर सन्मान असेल स्वातंत्र्य असेल." आजचा काळात जर एकमेकांना आदर दिले गेले तर तितकाच समाज समान संधीने चालत जाईल. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये प्रत्येक यशस्वी पुरुष मागील ते त्या स्त्रीचा हातभार लागलेला असतो.

पुरुषसत्ताक पुरुषांना एकांगी बनवते ती त्यांचे काम फक्त पैसे कमावून आणणारी इतकेच मर्यादित करते. पुरुषांचे काम ते संसार चालवण्यासाठी कमवण्याचे काम करतो आणि त्याच दुसरी बाजूला स्त्रीने फक्त घरचे आणि घरातील काम करणे अपेक्षित आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. लागल्यास महिला बाहेर कमवण्यासाठी बाहेर पडतीलही परंतु घरातील कामे ही तिलाच करावे लागतात. मी असे नाही म्हणत की, पुरुषांनी घरातील सर्वच कामे बघायला हवी. जे कामे करण्यायोग्य आहेत ती कामे करणे अपेक्षितच आहे. माझ्या उदाहरणामध्ये एक महिला आहे. जिने भूतकाळात नको त्या अवहेलना त्रास सहन केलेल्या आहेत, अनेकविध विचार करून तिला काही आजारानेसुद्धा त्रासले आहे. पती कडून अतोनात त्रास सहन केला असून परंतु आज पण ती महिला पतीसोबत खांद्याला खांदा लावून संसाराचा गाडा हाकलत आहे. नाहीतर आजकालची काही महिला थोडीशी त्रास झाला की त्यांची डिव्होर्सपर्यंत मजल मारण्याची क्षमता ठेवतात. पण सोबत सोबती समजूत असेल तर अशा गोष्टी घडत नाही. असो तसेच पुरुषांनी आपल्या पाल्यांसाठी आर्थिक पिता न होता. त्यांना एक प्रामाणिक ज्ञानी पिता होणे ही गरजेचे आहे.

तसेच वेळोवेळी समाज हितासाठी आपले कर्तव्य पार पाडणे अपेक्षित

आहेत. परंतु कर्तव्यशून्य काही पुरुष आपले, साधे मुलांचे शिक्षणाचेसुद्धा काही काळजी करत नाहीत. महिला ते काम करते म्हणून करू द्यायचे असे नव्हे तर त्यात काही अडचणी येत असतात. त्या अडचणींना सामोरे जाताना काही त्रास होतोच. निदान त्या त्रासाला नाही सामोरे गेले तरी चालेल परंतु, त्या त्रासासोबतही राहिले तरी काही महिलांना बरे वाटेल.

वंदन त्या स्त्रीला जिने शिक्षणाचे दार
उघड केलीत...
वंदन त्या स्त्रीला ज्यांनी यशस्वी
पुरुषांना साथ दिला...
वंदन त्या स्त्रीला जिने अन्यायाविरोधी...

१५ ऑगस्ट संपन्न होत आहे येत्या काही दिवसांत याला पूर्ण ७१ वर्षे होणार आहेत परंतु आजही आपल्या स्वप्नातील भारत कसा असायला पाहिजे हा विषय येत राहतो. तर का? तर नव नवीन विकास होत आहे आणि नवनवीन समस्या पुढे येत आहेत. जितका जास्त विकास होत आहे तितक्याच प्रमाणात समस्याही पुढे येत आहे. बुलेट ट्रेन आज मुंबई ते अहमदाबाद पहिली धावणार आहे. परंतु त्याच्या सोबतीला अनेक समस्याही येत आहेत. पर्यावरणापासून ते राजकारणी लोकांपर्यंतचा विरोध असो एकीकडे प्रगतिपथावर देश जात असताना दुसरीकडे गरीब गरजू समाजाची तितकीच समस्या वाढत आहे. ज्या देशात गरिबाचा देश म्हणून ओळखला जातो त्या देशात बुलेट ट्रेन चालू करण्याअगोदर गरीब समाजाकडे ती बघणे अपेक्षित आहे.

तसेच या देशातील तरुण मंडळी भरकटलेली दिसत आहेत. सनातनी विचारसरणींच्या संघटना यांना पाठबळ देत आहे. तरुणांना थोडे प्रमाणात काही पैसे मिळाले किंवा थोडीफार राजकारणी लोकांकडून इज्जत काय मिळाली तर त्या राजकारणी लोकांसाठी काहीही करायला तयार आहेत. हा ज्याचा त्याचा प्रश्न परंतु ज्या वयात काही करण्याची जिद्द असते. काही मिळण्याची ताकद असते त्याच वयात आपला अनमोल वेळ वाया घालवत असतात. आज किती तरुण ज्या स्वप्नातील भारत देशाला गरज आहे. तेच तरुण आज नको त्या संघ, संघटना पक्ष यांच्या मागे लागला आहे. तरुणांनी राजकारणात नक्की जावे परंतु त्याला कोणता platform योग्य आहे ते ठरवले पाहिजे. ज्या पक्षात आपला फक्त वेळेचा उपयोग करून घेतात किंवा आपला ताकदीचा उपयोग करून घेतात. तेथे निदान आपल्या बुद्धीचाही विकास होत नाही. फक्त रूढी - परंपरा नुसार धार्मिक उत्सव यावरून राजकारण करीत असतात. अशा पक्षांकडून धर्मावरून तर काही तर चक्क शिवाजी महाराजांवर राजकारण करीत असतात. कधी-कधी मला यांच्या बुद्धीची कीव येते. कारण ज्या देशात आजही दलित समाज मागासलेला आहे किंवा मागासवर्गीयांसाठी किंवा बहुजन समाजाच्या विकासासाठी राजकारण करणे सोडून देतात. ज्या बहुजन समाजातील तरुणांना हे पक्ष उपयोग करतात. त्यांना निदान स्वप्नातील भारत देशावर विकासावर राजकारण का करत नाहीत आजही. आजही समाजातील लोक शिक्षणापासून वंचित आहेत तर काही आर्थिक विकासासाठी झटत आहेत. मी असे नाही म्हणत की, माझेच सर्व काही खरे आहे. परंतु स्वत: चिकित्सक विचार करा आणि स्वत:ला प्रश्न विचारा की ते योग्य आहे की अयोग्य - कारण तरुणांना त्यांचा अमूल्य वेळ वाया जात आहे हे जर निदर्शनास नाही आणून दिले तर बहुजन समाजातील तरुण मंडळी अशीच भरकटत राहणार.

आज खरे तरुणांनी राजकारणात येणे खूप गरजेचे आहे. परंतु पारंपरिक नुसार राजकारण चालत येत आहे आणि एखाद्या मंत्र्याचा मुलगा किंवा मुलगी मंत्रीच होतात आजतागायत असे तुम्हाला किती तरी उदाहरणे सापडतील. नव तरुण काही राजकारणात येण्याची हिम्मत तर करतात, परंतु त्यांना ते टिकवू देत नाहीत.

तसेच माझा स्वप्नांतील भारत जर बघायला गेलो तर आज आरक्षणावरून राजकारण खूप मोठ्या प्रमाणात केले जाते. ते योग्य आहे का ज्या समाजाला किंवा जातीला आरक्षणाची गरज आहे त्याच समाजात देण्यात यावे असे वाटते. कारण ज्या समाजाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास पूर्णता झालेला दिसत आहे. त्या समाजाला आरक्षणाची काय बरे गरज आहे. सर्वांना समान संधी आणि आरक्षण काढून घ्यावे असेही करता येणार नाही.

स्वप्नातील भारत देशाबद्दल बोलायचे झाले म्हणजे तर काही रूढी परंपरा चालत आल्या आहेत जसे सत्यनारायण, लग्नविधी, लग्नानंतरचा विधी, महापूजा, महाआरती, शांतीपूजा असे अनेक विधी नको त्या चालीरीती चालू असतात. परंतु यातून होणारा खर्च आणि वेळ हा जर एखाद्या गरीब आणि गरजू व्यक्तींसाठी उपयोगी पडला तर त्याचे त्याचे नक्कीच कल्याण होईल. तुमच्या भाषेत स्वर्ग प्राप्ती होईल. ह्या चालीरीतींसाठी जो लागणारा पैसा आणि वेळ आहे. त्यामध्ये बहुजन तरुणांचा जास्त पुढाकार असतो. ज्या गोष्टींसाठी आपल्याला वेळ द्यायचा आहे अशा गोष्टिकडे आपोआप दुर्लक्ष होते कारण सनातनी लोकांचा ब्राह्मणांन उद्देश तोच आहे की बहुजन समाजातील तरुणांना धार्मिक कर्मकांडात अडकून ठेवले तर त्यांचा दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष जाणार नाही. (दुसऱ्या गोष्टी म्हणजे IAS, IPS, MPSC, UPSC असे exam) आणि तरुणाचा उपयोग कसा धर्माचा नावाखाली उपयोग करून घेता येईल हे बघतात असे वर्षानुवर्षापासून चालत आलेले आहे. आजपर्यंत जितक्या ही धार्मिक दंगली झाल्या आहेत तितक्या मोठ्या प्रमाणात बहुजन समाजातील तरुण त्याला बळी पडलेली आहेत. आज विरोध माझा हे हिंदू सण-उत्सव यांना नाही तर योग्य काय आणि अयोग्य काय ही विचार सरणी तुमच्या मनात रुजवण्याचा मी प्रयत्न करीत आहे बाकी काही नाही.

❐

# स्त्रीचे स्थान - कुटुंब - समाज

■ जयश्री पाटील

आजची स्त्री कितीही पुढे गेली असली तरी समाजामध्ये व कुटुंबामध्ये मिळणारे दुय्यम स्थान, एखाद्या महिलेला जर वाटत असेल तिने स्वत:च्या पायावर उभे राहावे, चार पैसे मिळवावे. तरी तिला नवरा, सासू, सासरे यांचा विरोध असतो. बाई माणसाने चार भिंतींच्या आतच राहावे, असे बोलले जाते. तिला मनापासून वाटते की, मला सुद्धा उंच आकाशात झेप घ्यायची आहे. तरीही पावलोपावली तिचे मन मारले जाते. तसेच एखादी स्त्री घरच्यांचा विरोध पत्करून स्वत:च्या पायावर ठाम राहते तरीही तिला कुटुंबातील लोक घालून पाडून बोलत असतात. तिचा अपमान करत असतात आणि आपला समाज सावित्रीबाईंपासून ते आतापर्यंतच्या बाईंचा अपमान करून ती रस्त्याने चालली की टिंगळटवाळी करून, तिजे जिणे नकोसे करतात. स्त्रियांसाठी राजकारण म्हणजे एक तारेवरची कसरत असते. पुरुष मंडळी आपल्या स्वार्थासाथी राजकारणामध्ये तिचा वापर करून घेतात. वेळ पडेल तेव्हा एखाद्या वस्तूप्रमाणे तिचा वापर करून घेतात. एखादी स्त्री ग्रामपंचायतमध्ये निवडून आल्यास तिचे सुरुवातीस कौतुक होते. सत्कार होतो.

ती निवडून आल्यावर तिच्या नावाची खुर्ची स्वत: नवरा सांभाळत असतो. तिला ग्रामपंचायतमध्ये जाऊ देत नाहीत, जर ती विरोध पत्करून गेली तरी तिला ग्रामपंचायतीतील पुरुष सदस्य तिच्याकडे तुच्छ नजरेने बघतात व तिला कामकाजात सहकार्य करीत नाहीत पण एखादी स्त्री अशी असते की कुटुंब व समाजाचा विरोध पत्करून ती ठामपणे गावचा कारभार व्यवस्थितपणे चालवत असते व होणाऱ्या परिणामाची भीती न बाळगता कामकाज करीत असते. जर सांगायचे असेल तर आमच्या गावातील सौ. कुसुम परीट या एक महिला सरपंच होत्या, त्या इतर मागास प्र. वर्गातून निवडून आल्या होत्या, त्यावेळी मी स्वत: डेप्युटी सरपंच होते. गावचा कारभार कसा करावा याची काहीही माहिती नसतानासुद्धा आम्ही दोघींनी बेधडकपणे कामकाज केले होते. गेली २५ वर्षे गावामध्ये रस्ते, गटारी, लाईटची सोय, सांडपाणी निचरा, राष्ट्रीय पेयजल योजना या सगळ्या गोष्टी गावामध्ये आल्या नव्हत्या. मात्र आमच्या दोघींच्या कारकीर्दीमध्ये बरीच कामे करून घेतली. एक स्त्री तिच्या मनात आणले तर अशक्य गोष्टी शक्य करू शकते. या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये वेळोवेळी पुरुषांनी तिला कमी लेखण्याचे काम केले आहे. पण तिच्यातील शक्ती जागृत झाली तर भल्याभल्यांना पाणी पाजवते. पण समाज व्यवस्था व कुटुंब व्यवस्थेने तिच्यातील शक्तीला दाबण्याचे काम केले आहे. काय चूक आहे म्हणून पोटात असल्यापासून ती मरेपर्यंत तिला सन्मानाने जगू देत नाहीत. एकीकडे हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया वैमानिक झाल्या आहेत. कुठल्याच स्वरूपाच्या कामामध्ये ती आज कमी नाही. पण एकीकडे माझ्या गटातील महिलांना सावित्रीबाई फुले व जागतिक महिला दिन या गोष्टी त्यांना माहीतच नाहीत. याचे फार वाईट वाटते. परवा धरणगुत्तीमध्ये बचत गटाची मीटिंग घ्यायला गेले असताना एका महिलेला मी विचारले तुमचा नवरा तुझी अक्कल गुडघ्यात आहे असे म्हणतो, त्यावर ती म्हणाली असे तो रोजच मला म्हणतो, मी तिला विचारले तुमची अक्कल गुडघ्यात आहे? त्या होय म्हणाल्या. याचे मला खूप वाईट वाटले. स्वत:चा नवराच बायकोला दुय्यम स्थान देतो. खरे म्हणजे कुठल्या दृष्टिकोनातून स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले असे म्हणायचे, यासाठी अजून खऱ्या अर्थाने आपण

सर्वजणी मिळून महिलांना शहाणे करणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांमधील अंधश्रद्धा व अन्याय सहन करण्याच्या प्रवृत्तीविरोधात एकत्रित प्रयत्न व प्रबोधन करणे गरजेचे आहे.

प्रेरणा

खर सांगायचं तर आपल्या मेधा ताई यांच्याकडे बघितले तर मला असे वाटते की, ताईंकडे पाहिल्यावर एक वेगळीच ताकद व ऊर्जा तयार होते. मेधाताईसारखे प्रेमळ व कर्तृत्ववान व्यक्ती या महाराष्ट्रामध्ये कोणीही नाही. ताईंनी हजारो स्त्रियांना आर्थिक सक्षम बनवले आहे. त्यांचे आरोग्य संपन्न केले आहे. हजारो स्त्रियांच्या आरोग्याची व कुटुंबाची काळजी एका अन्नपूर्णा परिवाराच्या छताखाली घेतली जाते. मेधाताईंचा आदेश घेऊन पुढील काळात गोरगरीब महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काम करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहूया. तरच खऱ्या अर्थाने स्त्रियांना कुटुंबामध्ये व समाजामध्ये स्वातंत्र्य मिळेल, अन्यथा वर्षानुवर्षे स्त्रियांच्यावरील अन्याय, अत्याचार असेच चालू राहतील.

**कॉम्रेड जयश्री पाटील,**
**श्रमशक्ती परिवार, इचलकरंजी**

❐

---

आपल्या भारताला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले पण अजूनही स्त्रियांना स्वतंत्र राहायचा अधिकार नाही मिळाला आहे. १५ ऑगस्ट १९४७ जसे पूर्ण भारताला स्वातंत्र्य मिळाले तसे पूर्ण स्त्रियांना पण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. पहिली प्रथा होती जशी की मुलगा सर्व्हिस करणारा असला पाहिजे पण मुलगी फक्त घरकाम करायला हवे आहे. मला ह्या जुन्या प्रथांच्या विचारांशी सक्त राग येतो. का फक्त मुलांनीच नोकरी कराव्यात मुलगी पण आपल्या घराचे नाव रोशन करू शकते? फक्त मूलच वंशाचा दिवा असतो मुलगी का वंशाचा दिवा बनू शकत नाही. २०१३ मध्ये जेव्हा माझे बाबा वारले होते तेव्हा त्यांना अग्नी देण्याचा वेळी माझ्या दादाला बोलावले. पण मला नाही. मला तेव्हापासून एक मनात प्रश्न पडतो की? का फक्त मुलांनीच बाबांना अग्नी द्यावा मुली का बाबांना अग्नी देऊ शकत नाही.

तर माझ्या या विचारांनी तर असे वाटते की, कधी तरी जे मुलांना हक्क दिले जातात ते मुलींना पण द्यावेत.

तर २०१४ मध्ये जेव्हा माझे बाबा वारले त्यांना एकच वर्ष झाले होते. तेव्हा आमच्या शाळेत १५ ऑगस्ट साजरा करणार होते. तेव्हा सगळा कार्यक्रम संपत आला आणि मी एकटीच उभी राहिली, आणि जिथे झेंडावंदन केला तिथे जाऊन म्हणाली का अजूनही मुलींना कमी लेखले जाते, मुले जे करतील ते चांगलं, जे मुली करतात तेच का वाईट, मला तर असं वाटतं की सर्वांनी आपल्या मुलींना सक्षम बनवावे व तिला पुढे जाण्यासाठी तिला आधार द्यावा.''

मी हे जे भाषण केले होते तेव्हापासून मी निर्णय घेतला आपला भारत अजूनही स्वतंत्र नाही झाला, ज्या देशात महिलांचा आदर नाही तो देश कसा स्वतंत्र म्हणून मी पण महिलांचा आदर करायला शिकली व महिलांना सक्षम बनवली शिकली तर तुम्ही पण असाच वागाल अशी माझी अपेक्षा आहे की सर्व 'महिलांना' स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, सर्वांना आपल्या मर्जीने आपले जीवन जगले पाहिजे. तर हे मी माझ्या आईपासून सुरुवात केली आहे. पहिला आपल्या घरातील माऊलीचा आदर करा व बाहेरच्या प्रत्येक माऊलीचा आदर करा. मी तर सुरुवात केली आहे. '' प्रत्येकाला आपले स्वातंत्र्य कसा मिळवता आला पाहिजे व आपण जे करतो ते बरोबर आहे का, हे पण लक्षात घेतलं पाहिजे. ''आजकाल आपण बघतच असतो, की महिलांमध्ये तर खूप अशा गोष्टी असतात.'

जसे की एखाद्याच्या मुलाचे काही वाईट झाले की लगेच आजकालच्या बायका इकडे-तिकडे चुळबुळ करायला सुरू करतात, जर आपणच आपल्या घरातील किंवा बाहेरील बहिणीचा, माऊलीचा जर आपण तिचा उद्धार नाही केला किंवा तिला पुन्हा उभे राहण्याची शक्ती नाही दिली तर स्त्रिया कशा सक्षम बनतील. भारतात स्वातंत्र्य १९४७ मध्ये मिळाले व हुंडाबळी १९६८ मध्ये सुरू झाले ती हुंडाबळीमुळे गेलेली आजकालच्या स्त्रियांचे बळी त्यांना कोन वाचवणार आपणच ना अजून कोण?

माझ्या मते प्रत्येकांनी आपण जे मुलांचे बळी जातात यांना वाचवलं पाहिजे. सांगायचे झाले तर मला पण स्त्रियांचा खूप राग येतो. त्यांनी पण आपले स्वप्न स्वीकार करावे. आपण पुढे जाऊन आपल्या आई-बाबांना सांभाळायचे आहे. पण त्यांना समजत नाही ते पुढे जाऊन लग्न करतात व नवऱ्याबरोबर सुखी व इकडे ज्यांनी आपल्याला कोशातून बाहेर काढले त्याचं काय त्यांना कोण? सांभाळणार आपला भाऊ? अरे बाप रे तो म्हणजे डोक्याला ताप तो पण त्याची पत्नी आल्यावर आपल्या आई-बाबांना उचलून घरी वृद्धाश्रमात जातात. तर माझ्या मते सर्वांनी जसा भारत स्वतंत्र केला तसे आपल्या सर्व महिलांना पण स्वतंत्र केले पाहिजे व त्यांना साक्षर केले पाहिजे असे माझे मत आहे. सर्वांनी आजपासून महिलेचा आदर करायला शिका, तेव्हा पुढे महिलापण सक्षम होतील.

**■ साक्षी विलास माने, १० वी**

# एकजुट महिलांची

■ **अलका कुंभार**

निर्णय स्वातंत्र्य - महिला आरक्षणाचा बोलबाला आहे, परंतु ते फक्त कागदोपत्रीच आहे, असे मला वाटते. उदाहरण द्यायचे झाले तर कुठल्याही क्षेत्रातील निवडणूक असू दे महिलांच्या नावाने अर्ज करायचा व निवडून आल्यावर त्या नावापुरत्याच पदावर असतात बाकी निर्णय नवरेच घेतात. अहो, साहेब महिलांना स्वत:चे निर्णय घेऊ द्या हे निर्णय स्वातंत्र्य आम्हा महिलांना हवे आहे.

व्यक्ति स्वातंत्र्य - स्त्री ही मुलगी, बहीण, बायको इ. सर्व नाती सांभाळून नोकरी करते, घरच्या कुठल्याही जबाबदाऱ्या न झटकता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात, ही एक प्रकारची तारेवरची कसरतच. तरीही ती पुढे गेलेली चालत नाही. तिच्यात कुवत, बुद्धिमत्ता आहे. तर चालना मिळायलाच हवी असे व्यक्ति स्वातंत्र्य आम्हाला हवे. संधीचे सोने करणे - हा स्वत:चा अनुभव आहे. मुलाचे लग्न होते. साधारण दुपारचे तीन वाजले होते. मी पूजेचे साहित्य घेऊन घरी येत होते. मोटारसायकलवर तीन साखळी चोर आले त्यांनी माझ्या गळ्यातील गंठन खेचून पटकन गाडीवर बसला. मी क्षणांचाही विलंब न लावता गाडी पकडली व गाडीच्या बरोबरीने जाऊ लागले गाडीचा वेग वाढल्यावर मी माझी सर्व शक्ती एकवटून गाडी खाली पाडली तेव्हा त्यातील दोघेजण पळून गेले व ज्याच्या हातात गंठन होते तो सापडला. तेथे नाल्याचे काम चालू असल्यामुळे छोटे-मोठे खूप दगड होते, त्यांचा वापर त्याला मारण्यासाठी झाला. माझ्याबरोबर माझ्या धाकट्या दोन जावाही मारू लागल्या. तो मला म्हणाला मला मारले तर चाकूने भोसकेन मी म्हणाले जिवंत राहिलास तर ना? मग त्याने आजूबाजूचा अंदाज घेतला व माझ्या हातात गंठन देऊन पळ काढला. माझ्या हाताची दोन बोटे वाकडी आहेत. परंतु सोने जाऊ दिले नाही.

कायद्याने महिलांना काही निर्णय स्वातंत्र्य हवे - हल्ली बलात्काराचे प्रमाण खुप वाढले आहे. कामावरून किंवा शाळेतून-कॉलेजमधून घरी मुली व महिला सुरक्षित घरी येतील याची शाश्वती नसते. तसेच लहान मुलीना जपणे अवघड झाले आहे. याचे वाईट वाटते. अलीकडेच वर्तमानपत्रातील बातमी वाचून मन हेलावून गेले. नवऱ्यानेच आपल्या बायकोला व अवघ्या आठ महिन्यांच्या बाळाला मारण्यासाठी सुपारी देऊन मारून टाकले. असा मारेकरी नराधम नवराच असेल तर महिलांनी सुरक्षिततेची अपेक्षा तरी कोणाकडून ठेवावी. या साठी कायद्यात काही बदल घडणे अपेक्षीत आहे. ज्यामुळे असे कृत्य करण्याचे धाडस होणार नाही.

महिलांनी एकत्र एकजुटीने निर्णय घेणे - मी नवीसांगवी येथील तुळजाभवानी पतसंस्थेमध्ये संचालक पदावर १६ ते १७ वर्षे काम केले, संस्थेचा एक रुपयाही न घेता किंवा मीटिंग भत्ताही न घेता, त्यापासून माझा एक फायदा झाला. बऱ्याच महिलांची ओळख झाली व त्या अनुषंगाने मी बचत गटाची स्थापना केली. परंतु घरगाडा ओढायचा तर त्यासाठी स्वकष्टाचा पैसा पाहिजे म्हणून मी अन्नपूर्णा सभासद होऊन कर्ज घेतले व साड्या व ड्रेस मटेरिअल विकण्याचा घरगुती व्यवसाय सुरू केला. मी आतापर्यंत पाच वेळा लोन घेतले व व्यवस्थित परतफेडही केली. आता मी अन्नपूर्णा सी. आर. झाली आहे. माझी पहिलीच मीटिंग वारज्यामध्ये होती. सांगवीच्या बाहेर जाऊन काम केले नसल्यामुळे पत्ता विचारत - विचारत वारज्यात पोहोचले

परंतु उशिराच, थोडी गडबडले, पण लगेचच स्वत:ला सावरले उशिरा येणाऱ्यासाठी टाळ्या वाजवल्या जायच्या हे कळले व मनोमन ठरवले उशीर करायचा नाही. पुढील महिन्याच्या मीटिंगमध्ये समजले की मीटिंग संपल्यानंतर अन्नपूर्णाच्या नवीन भव्य पाच मजली इमारतीचे उद्‌घाटन करायला जायचे आहे, आम्ही सर्व जणी तेथे पोहोचलो आणि समोर पाहतो तर काय? मेधाताई समोर दिसल्या मला क्षणभर काही सुचलेच नाही. कारण मोठ्या मीटिंगला मेधाताई खूप लांबून पाहायला मिळायच्या आम्ही सर्वांनी त्यांच्या बरोबर फोटो काढले व त्यांच्यातील आपुलकीचा भाव समजला. तेव्हाच मला वाटले हीच आमची झाशीची राणी, कारण एवढ्या प्रमाणात महिला एकत्रित आणणे म्हणजे साधी गोष्ट नाही, असो साखर संकुलचे मैदान महिलांच्या मीटिंगला अपुरे पडते म्हणजे काय? आणि कार्यक्रमही शांतपणे पार पडतो. आता हेच बघा ना. १८५७ च्या हिंदुस्थानच्या लढ्यात ''माझी झाशी मी देणार नाही '' असे इंग्रजांना ठणकावून सांगणारी राणी वाघिणीसारखी लढली व आपले नाव सुवर्ण अक्षरांनी लिहून गेली. अशाच आमच्या भावना मेधाताईंबद्दल आहेत. ❐

---

महिला म्हणून मला असे वाटते की, तिने समाजामध्ये पायावर उभे राहून कोणत्याही वाईट भावना मनात आणू नये, तिला तुम्ही असे काही प्रोत्साहन द्या कि ती एक स्त्री म्हणून नाही तर एका कुटुंबाला सांभाळते तर तिला तुम्ही पूर्ण पाठिंबा द्यावा, ती कामाला गेली की काही समाजातल्या पुरुष, नवरा गेला म्हणून तिच्याकडे वाईट नजरेने पाहणार बोलणार हे चुकीचे आहे, स्त्रियांना ही पूर्णपणे स्वतंत्र आहे की ति जस जगत आली तसंच पुढेही जगत राहावं, ती चांगली राहील, चांगली कपडे घातली की तिला बोलणार का कशासाठी तिला हक्क नाही का? तिला मन नाही का? का तिला समाजात वापरण्यांची पण बंदी, कोणाशी बोलण्याची चोरी, कामाला जात असली तर उशीर झाला तर तिला बोलणार समाज कुजबुजणार का? हे सगळं तर ति तिच्या परिवारासाठी करते ना? हे सगळं कुठे तरी थांबायला हवं, हा विचार आपल्यातून करण्याची सुरूवात करा, तिला समाजात पूर्णपणे स्वत:ने जगण्याची, राहण्याची संधी नक्की हवी, कोणाचा कमी वयात नवरा गेला त्यात तिचा दोष नसतो ना, मग तिने का सगळं सहन करायचे कशासाठी थोडा तिचा पण विचार करायला हवा आणि म्हणून मला असे वाटते की स्त्रीला ही पुरुषाप्रमाणे स्वातंत्र्य हव, ती नक्कीच यशस्वी होईल.

**■ कल्पना कापसे, ब्रॅच नं. ४ पुणे**

---

माझे नाव दीपाली विजय गायकवाड, राहणार मुंढवा नोकरी करीत आहेत. महिला म्हणून सर्वप्रथम जो स्त्रीला मान - सन्मान मिळावा तिला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव असावी व तिने स्वत:च्या पद्धतीने त्याचे निवारण करण्यास त्यांना स्वत:हा समर्थ असले पाहिजे जिने करून स्वत:साठी जगणे इतरांसाठी जगणे फार गरजेचे आहे. आपण स्वत:चे स्थान निश्चित करून आपण आपल्या कुटुंबाबरोबर इतर दुसऱ्यासाठी कसे जगावे हे तिला समजले पाहिजे. उदा. स्त्रीने सर्व आपल्या घरापासून सुरूवात करावी आपल्या मुलाबाळाना चांगले संस्कार द्यावे. एक स्त्री म्हणून तिने समाजात चांगले कार्य पार पाडावे, जे करून माझ्या मनाला समाधान मिले की मी माझ्या घरासाठी व इतरांसाठी स्वताच्या मनाने अंत:करणापासून प्रयत्न करते.

स्त्री म्हणून मला कुठलीही बंधन नसावे. माझा निर्णय मी स्वत: घेण्यात समर्थ असणारी चांगले - वाईट या गोष्टीचा विचार करणारी व आपल्या स्वत:चा विचार करणारी व आपल्या स्वत:चा विचार न करता दुसऱ्याचा विचारांचा आदर करणारी.

दुसऱ्यांनी माझ्यावर कुठला प्रकारची बंधने न टाकावी असा विचार करणारी माझे शिक्षण, नोकरी यामध्ये स्वत:चे विचार मांडणारी अशी स्त्री असावी. एक स्त्री म्हणून मी कधीच स्वत:ला कमी न लेखणे व इतरांनाही कधी एक स्त्री म्हणून कमी न लेखणे. स्वत:चे अस्तित्व स्वत:ला निर्माण करण्याची जिद्द बाळगणे व आचार-विचार स्वत:चे स्वत: मांडण्याचे स्वातंत्र्य एक स्त्रीला असावे.

**■ दीपाली विजय गायकवाड, ब्रॅच नं. ६ पुणे**

# महिला व निर्णय स्वातंत्र्य

■ अख्तर शेख

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७१ वर्षे झाली, पण महिलांना स्वातंत्र आहे का?

आज पण ह्या युगात हुंडाबळीमुळे महिला जाळली जाते. ह्याला कोण जबाबदार आहे. महिला का समाजपूर्वी पती मेले तर महिला सती व्हायची. तिची इच्छा नसली तरी आपल्या पतीबरोबर तिला जाळली जात असे. का तर ती विधवा झाली. तर तिला जगण्याचा अधिकार नाही का? ती आपल्या स्वखुशीने विधवा झाली का?

तिला दुसरे लग्न करण्याचा अधिकार नाही का? कित्येक देशात मुलींना शिकवत नाही कारण तिला चूल आणि मूल ऐवढेच करायचे आहे. का महिलांचे जीवन फक्त चूल आणि मूल एवढेच करायचे आहे का? घरात अगर मुलगा असेल तर परिस्थितीमुळे मुलीचे शिकवण (शिक्षण) थांबवले जाते का? पण मुलीला शिकण्याचा अधिकार नाही का? महिला शिकली तर दोन कुटुंबाला शिकवते, माहेर व सासर तिचे शिक्षण गरजेचे नाही का? जबरदस्तीने तिचे शिक्षण थांबवून तिची इच्छा नसताना तिचे लग्न करून दिले जाते, मग तिने आपले मन मारणे, इच्छा मारणे आणि लग्न करून घेणे, असे महिलांच्या बाबतीतच का होते.

महिलेने प्रत्येक वेळेस बलिदान का द्यावे, कारण ती मायेची सावली आहे. तिने प्रत्येकाचा विचार करावा - स्वत:चा नाही का?

आज महिला पुरुषांच्या बरोबरीने उभी आहे. पुरुषांबरोबरीने काम करते, आपले घर, ऑफिस, मुले, नातेवाईक सगळ्यांना सांभाळते. सगळ्यांच्या आवडीनिवडीची काळजी घेते. आपल्यामुळे कोणाचे मन दुखू नये ह्याची काळजी घेते. सदैव तिची इच्छा असते आपल्या सासरची माणसे, माझे पती-मुले आनंदित राहावीत. एवढे सर्व करूनसुद्धा तिला भीती असते की मला. जर कामाला येण्यास उशीर झाला तर घरात ते लोक रागावतील तिला आपल्या टाईमात आले काम उरकावे लागते. आपला देश एवढा पुढे चालला आहे की महिला चंद्रावरसुद्धा जाऊन आली, विमान उडवते, पंतप्रधान झाली पण समाजाचे विचार ते घाणेरडेच. आज महिला पुरुषाशी मैत्री करू शकत नाही. जर तिला एखाद्या व्यक्ती आवडली तर त्याच्याशी ती मैत्री करू शकत नाही, कारण समाज काय बोलेल तिला चारित्र्यहिन ठरवेलं तिने आपले चारित्र्याचे त्याला राखी बांधूनच सिद्ध करावा. का आपल्या चरित्र्याचे सर्टिफिकीट द्यावे का? तिला राखी न बांधता आपले मित्र निवडण्याचा अधिकार नाही का? राखी न बांधल्यामुळे तिचे चारित्र्य पवित्र राहणार नाही का?

महिला दुर्गा आहे, सरस्वती आहे. काली पण आहे, पण ती कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाऊ शकते, एवढे करूनसुद्धा तिला कसले स्वातंत्र्य आहे का? हल्ली मुलींना, महिलांना, वृद्ध महिलांना रात्री बाहेर पडणे म्हणजे धोकादायकच आहे. कोणी कधी बलात्काराचा बळी पडेल ह्याचा नेम नाही. महिलांना बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य नाही का? महिलांनी हा त्रास कधीपर्यंत सहन करावा.

महिलांना सदैव दुसऱ्याचेच ऐकावे लागते. लहानपणी आई-वडिलाचे मोठ्या पणी भाऊ असेल तर त्यांचे लग्न झाले तर पतीचे म्हातारे झाले तर मुलाचे (सुनाचे) ऐकावे महिलांचे पूर्ण आयुष्य दुसऱ्याचे ऐकण्यात जाणार का त्यांना देवाने एक आयुष्य दिले आहे. त्यांना आपले जीवन स्वत:च्या इच्छेने जगण्याचे स्वातंत्र्य कधीच मिळणार नाही का?

❐

# भारत सुजलाम् सुफलाम्

■ आरती पवार

'माझ्या स्वप्नातील भारत' म्हटल्यावर सर्वप्रथम माझ्या मनात येते की प्रत्येकाच्या स्वप्नातील भारत सारखाच असला पाहिजे, असे नाही. सर्वांच्या स्वप्नातील भारतांच्या संकल्पना, विचार व मत हे भिन्न असू शकतात. आपले विचार कसे आहेत. आपण कोणत्या परिस्थितीचा संबंधित विचार करतो आहोत आणि महत्त्वाचे म्हणजे आपण कोणत्या गोष्टींना महत्त्व देत आहोत. यावर प्रत्येकाच्या स्वप्नातील भारत यातील संकल्पना स्पष्ट होत असतात.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे माझ्या भारत देशाबद्दल माझे असीम प्रेम भावना व आदर आहे. माझ्या भारत देशाबद्दल माझी अनेक स्वप्ने आहे, कारण माझा देश विकसित व प्रगतिशील तर आहेच पण त्याला विकसनशील व प्रगतिशील तर आहे. पण त्याला विकसनशील भारत बनवण्याचे माझे स्वप्न आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळूनही आज भारत मला इतर देशांच्या तुलनेने मागासच आहे असे वाटते. याला योग्य पदावर आणण्यासाठी काही गोष्टी अपुऱ्या आहेत, तर काही वाईट प्रवृत्ती आड येतात ते कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. भारताच्या प्रगतीपुढे आड येणारे काही मुद्दे माझ्या डोळ्यांसमोर आहे, ते असे की -

१) भारतीय संरक्षण सुरक्षा दलाचा अपुरा अभाव.

२) स्त्रियांमधील असमानता! असुरक्षितता

३) मराठा आरक्षण, जातिभेद

४) शेतकरी आत्महत्याचे वाढते प्रभाव

५) 'स्वच्छ' भारत संकल्पना

६) वृक्षतोड यावर पर्जन्यावर होणारा परिणाम

७) भ्रष्टाचार

८) सरकारी राजकीय व प्रशासकीय कामकाजात योग्य पदोन्नतीचा अभाव

९) श्रीमंती व गरिबी भेदभाव

१०) संस्कृती व परंपरेची जपणूक

माझ्या स्वप्नातील भारत म्हटल्यावर सर्वप्रथम माझ्या मनात काय होत: येत आहे तर ती 'भारतीय सुरक्षा' मला वाटते आपल्या भारतात स्वत:ची सुरक्षा व संरक्षण स्वत: करण्यासाठी भारत स्वत: सक्षम असावा भारताने कोणावरही अवलंबून राहू नये. उदा. दारूगोळा म्हणा, लढाऊ विमाने म्हणा, युद्धनौका म्हणा, संरक्षण, साहित्य, क्षेपणास्त्रे, रणगाडे इ. वगैरे आपणास माहीत आहे का? ३०% युद्ध साहित्य आपल्या भारत देशात तर ७०% युद्ध साहित्य हे आपल्याला आयात कराव लागत. याचाच अर्थ की आज जरी क्षेपणास्त्र इतर देशांच्या तुलनेत मोठी मजल मारली असली तरी युद्धसाठी यात आपण रशिया, चीन, जपान, USA यांच्या तुलनेत मागेच आहोत. ते मला वाटते सक्षम होण्याची गरज आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे देशात स्त्रियांमध्ये असलेला असुरक्षितपणा. आजच्या स्त्रियांना समानतेची वागणूक नाही. तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन जेव्हा बदलेल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपला देश प्रगत होईल. निर्भयासारख्या अशा कितीतरी मुली आज न्याय / दाद मागत आहे. काय चूक होती त्यांनी मुली म्हणून जन्म घेतला ही? ही खरी मोठी दुर्दैवी गोष्ट आहे. भारतात जी की ती मला नको आहे, मला माझ्या भारत देशात मुलींच्या जन्माचे स्वागत झालेले बघायचे आहे. जेव्हा मुलांच्या कितीतरी दुप्पट पटीने मुलींच्या जन्मात वाढ. कदाचित आपोआप असुरक्षिततेच प्रमाण कमी होईल.

आरक्षण हा महत्त्वपुर्ण मुद्दा आज भारत देशात भेडसावत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच आरक्षण, मराठा आरक्षणासाठी संपूर्ण महाराष्ट्र समाज रस्त्यावर उतरला ते म्हणजे आरक्षण. एखादी गोष्ट मिळत नसेल तर ती अट्टहासाने मागणे म्हणजे आरक्षण खरंतर आरक्षण असणे किंवा मागणे हे काही चुकीचे किंवा गैर काहीच नाही पण... त्या आरक्षणाचा लाभ कोणाला होत आहे आणि महत्त्वाचे की कोणत्या क्षेत्रात आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातच काय तर संपूर्ण भारतात प्रत्येक व्यक्तीला गुणवत्तेनुसार शिक्षण किंवा नोकरीची संधी, समान संधी मिळायला पाहिजे, त्यासाठी शिक्षणासाठी भरावयाच्या फीमध्ये आरक्षण असावे असे कोणाचीच हरकत नसायला हवे.

माझा भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. खरं तर भारत हा शेतीवरच अवलंबून आहे, असे म्हणावे लागेल. पण मी हे पाहातेय काय माझ्या भारत देशातील शेतकरी बांधव आज आत्महत्येच्या विळख्यात अडकले. याला कोण जबाबदार. कारणे तर खूप आहेत. पण महत्त्वाचे आहे, तर शासन शेतकऱ्यांच्या मालाला योग्य ते हमीभाव मिळत नाही, वाढते कर्ज, अयोग्य पर्जन्य व अतिपर्जन्यामुळे होणारे पिकांचे नुकसान. मी माझ्या स्वप्नातल्या भारतात माझा शेतकरी सुजलाम् सुफलाम् व समाधानी बघायचे आहे.

'स्वच्छ भारत' ही संकल्पना फक्त ऐकायला तर सगळ्यांनाच आवडते पण त्याची अंमलबजावणी करणे हा हेतू महत्त्वाचा मुद्दा ठरतो. माझ्या स्वप्नातल्या भारतात मला माझा भारत स्वच्छ सुंदर स्मार्ट सिटी बघायचाय यासाठी प्रत्येक तरुण - तरुणी तसेच प्रत्येक व्यक्तींनी पुढाकार घ्यायला हवे.

आज सरकारी व प्रशासकीय कामकाजात इतके भ्रष्टाचार व्हायला लागलेत. सर्वप्रथम ते कमी झाले, तर आपोआप सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सुटतील. मला माझ्या भारतात नि:स्वार्थ भावनेने तसेच जनतेच्या प्रत्येक समस्या म्हणजे आपली समस्या अशी मानणारे अधिकारी हवे आहेत. कदाचित त्यामुळे तरी भ्रष्टाचाराला आळा बसेल.

आज माझ्या देशात श्रीमंती व गरिबी हा भेदभाव होत आहे. जर असे असेल तर प्रत्येक ''श्रीमंत घरातील वृद्ध वृद्धाश्रमात व गरिबांची मुले अनाथ आश्रमात का?''

मला वाटतं माझ्या स्वप्नातल्या भारतात श्रीमंती व गरिबी हा भेद असू नये. गरिबी व श्रीमंती ही जन्मजात नसून ती परिस्थितीशी संलग्न आहे. मला वाटते आज, ज्यांच्याकडे अमाप पैसा, संपत्ती आहे. त्यांनी चैनी, मंदिरात दान देण्यापेक्षा एखाद्या गरजू कुटुंबांना मदत करावी, एखाद्या अनाथ मुलाला किंवा शाळेतील विद्यार्थ्याला दत्तक घेऊन त्यांचा संपूर्ण खर्च व शिक्षण करावे. एखाद्या अनाथ आश्रम तसेच वृद्धाश्रमातील गरजूंना काही सुख, सुविधा व मूलभूत गरजा पुरवाव्यात असा जर प्रत्येक श्रीमंताने विचार केला तर आज आपण गरीब, झोपडपट्ट्यातील मुले व स्त्रिया रस्त्यावर दिसणार नाही. मला माझ्या देशात असे विचारांना प्राधान्य देणारे लोक हवे आहेत. त्यामुळे गरीब व श्रीमंती हा भेदच उरणार नाही.

मला माहीत आहे की माझ्या देशाला कला व संस्कृतीची देणगी लाभली आहे. त्यांची जपणूक व संवर्धन करणे आज महत्त्वाचे वाटू लागले आहे. मला माझ्या स्वप्नातला भारत असा असेल असे मला मनापासून वाटते. फक्त गरज आहे ते पुढाकार घेण्याची, असीम प्रयत्नांची आणि हे माझे स्वप्न नक्की पूर्ण होणार यात शंका नाही. मला माझ्या भारत देशाबद्दल अभिमान आहे. जाता जाता एवढेच सांगेन,

**''माझ्या स्वप्नातील भारत**
**असा स्वच्छ, गरिबीमुक्त आणि**
**जातमुक्त असावा...**
**जय भारत! जय हिंद...''**

❐

---

आजच्या युगात स्त्री कोणत्याही क्षेत्रात काम करत असली तरी, तिला पूर्ण पणे स्वातंत्र्य नसते. स्वत:च्या बाबतीत विचार केला तर पतीचा आधार नसलेल्या स्त्री प्रत्येक गोष्ट ही सासरच्या लोकांना किंवा इतरत्र कोणतीही गोष्ट करताना दडपण येत असते. ती स्त्री जरी बाहेर कामावर गेली तर तिला घरी येऊन सर्व जबाबदारी पार पाडावी लागते. घरातील सर्व कामे करून घेण्याच्या मागेच असतात. त्यांची कामे केली तरच ते लोक आपल्याला तेवढ्यापुरते कौतुक करतात नंतर मात्र पुन्हा तसेच स्त्रीच्या मागे कटकट करतात. परंतु त्यांच्या मुलांनी काहीही काम न करता राहू शकतात परंतु एक आधार नसलेली स्त्री मात्र आपल्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी राहू शकत नाही.

अन्नपूर्णामध्ये माझे हे दुसरे कर्ज आहे, कर्ज मी माझ्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केले आणि ते कर्ज वेळेवर फेडले. आज अन्नपूर्णामुळे मी स्वत:च्या पायावर उभे राहून मुलांचे शिक्षण पूर्ण करू शकते. अन्नपूर्णा आरोग्य निधीचाही वेळेवर उपयोग करू शकतो. अन्नपूर्णा विद्यापूर्ण शिष्यवृत्तीचीही आज लाभ मिळाला आहे. प्रत्येक स्त्रीला स्वतंत्रपणे समाजात काम करून ती स्वत:च्या पायावर उभी राहिली पाहिजे. समाजात अशा अनेक महिला या निराधार असतात त्यांना अन्नपूर्णाचा आधार मिळाला.

**■ सारिका जगताप, ब्रॅच नं. ७ पुणे**

# सन्मान स्त्रियांचा

■ **संजू पवार**

सीमा आई होणार आहे. बावीस वर्षांनतर घरात पाळणा हलणार. घरात सगळ्यांच्या आनंदाला उधाण आले. सगळेच खूप-खूप खूश आहे. सीमाची सासू म्हणाली मुलगाच व्हावा म्हणजे वंशाला दिवा होईल. वंश पुढे वाढेल. मी ऐकून जरा थक्कच झाले. वंशाला दिवा म्हणजे मुली, वंशाचा दिवा नसतात का? मुलगी तीच मुलगी जी स्त्री-पुरुषांच्या तुलनेत बहीण होऊन भावाला समजते. मुलगी असून वडिलांना समजते. बायको म्हणून नवऱ्याला समजते. आई म्हणून मुलांना समजते. मुलांना जन्म देऊन दुनिया घडवते. प्रत्येक आपल्या पुरुषाच्या मागे खंबीरपणे उभे राहून त्याला यशस्वी बनवते. तीच मुलगी तीच स्त्री आपल्या वंशाचा दिवा होऊ शकत नाही म्हणजे का, दुनिया चंद्रावर गेली तरीसुद्धा आपल्या जुन्या माणसांचे विचार जागेवरच तेसुद्धा इतके घाणेरडे. एक पुरुष शिकतो. तर तो एकटाच शहाणा होतो. पण एक स्त्री शिकते तर आपले पूर्ण घर कुटुंब शहाणा करते. समजावून संभाळून घेते. स्त्री कुठे कमी पडू नये. तिला समाजात. पूर्ण मानसन्मान दर्जा पूर्णपणे मिळावा. तिच्यावर कुठे अन्याय होऊ नये म्हणून महात्मा ज्योतिराव फुलेंनी आपल्या अडाणी बायकोला म्हणजे सावित्रीबाई फुलेंना पहिले तीन वर्षे घरात शिकवून जगात पहिली स्त्री-शिक्षिका म्हणून उभे केले. एवढे महान कार्य प्रत्येक स्त्री अडाणी राहून कमी पडू नये म्हणून आणि अशा नेत्यांच्या देशात बायकांचे विचार मात्र इतके घाणेरडे.

आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने चालतात. खांद्याला खांदा लावून आज स्त्री डॉक्टर होते. इंजिनीयर होते, पायलट होते, पोलीस होते, रिपोर्टर होते. शिक्षणामुळेच पुरुषांच्या बरोबरीने चालते. दुनिया घडवते. तरीसुद्धा तिच्या जन्माच्या वेळेस आपल्याला दु:ख व्हावे. छी...

मुलीऐवजी मुलगाच व्हावा. अशी आशा धरून मुलाच्या स्वागताची वाट बघणे आनंद साजरा करणे आणि मुलगी झाला की निराश होऊन खानदानीला ग्रहण लागले. देवाची मर्जी असे म्हणणारे अजूनही बरीच जुनी माणसे आहेत.

प्रत्येक ठिकाणी देवाला जायला वेळ नाही म्हणून त्याने स्त्रीच्या रूपात धरतीवर आई पाठवली. तिच्याच जन्माच्या वेळेस दु:ख करायचे? देशाला स्वातंत्र्य मिळून ६०-७० वर्षे पूर्ण झाली. तरी स्त्रियांच्या जातीला आणि जन्माला अजून स्वातंत्र्य नाही. अजून ती स्वतंत्रपणे मोकळी फिरू राहू शकत नाही. बंधनात राहते. मी तर कधी-कधी विचार करते, स्त्रियांची लाइफ म्हणजे काय नुसते तडजोड आहे. बाईला आज सन्मान मिळालाच पाहिजे.

❒

**एकत्र येणे सुरुवात आहे**
**एकत्र ठेवणे प्रगती आहे**
**एकत्र काम करणे हे यश आहे**

# वसा सावित्रीचा

■ **वंदना बनकर**

''पारंपरिक स्त्री मानसिकतेचा आरसा
आधुनिक स्त्री स्वयंप्रकाशाचा कवडसा''
असू दे स्वकर्तृत्वावर भरोसा
'सावित्रीबाईंच्या' साक्षरतेचा घेऊन वसा!

८ मार्च जवळ आली की सर्वत्र महिला दिनाची चर्चा होते. मग त्यानिमित्त विविध ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे स्त्रीचे कर्तृत्व नावाजले जाते. कधी पुरस्कार देऊन, कार्यक्रम करून, गौरव करून इत्यादी अनेक.

पण आज कलियुगात समाज सगळ्याबाबतीत पुढे आहे. परंतु आजदेखील स्त्री-पुरुष समानतेचे प्रमाण कमीच आहे. याला कारण देशातील लोकांची विचारशक्ती आहे. जी प्रत्येक वेळेस स्त्रीला कमी लेखून हा देश पुरुषप्रधान आहे. हे विदारक सत्य समोर आणते.

आज २१ व्या शतकात स्त्री प्रत्येक क्षेत्रात पदार्पण करताना दिसते. पूर्वी चूल आणि मूल करणारी स्त्री आज त्या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पेलून बाह्यक्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवून देत आहे.

पण हीच सावित्रीची लेक खरंच स्वतंत्र आहे? ही विचार करण्यासारखी बाब आहे. गर्दीत, समाजात, नातेवाईकांत एकटी स्त्री असेल तर ती सुरक्षित आहे का? नोकरीच्या ठिकाणी रात्री - अपरात्री प्रवास करणाऱ्या स्त्रियांच्या सुरक्षेचा विचार केला जातो? हे खरेच महत्त्वाचे मुद्दे आणि सगळ्यात मुख्य म्हणजे या असंघटित क्षेत्रातले तिचं अस्तित्व?

स्त्रियांचे जीवन अधिक सुरक्षित, सन्मानाचं व्हावं ही जी मागणी आहे यासाठी त्यांनीच पुढाकार घ्यायला हवा. हिंदुस्थानात आतापर्यंत घडलेल्या वैचारिक स्थित्यंतरात म्हणजे स्वातंत्र्यलढा असो किंवा इतर मुक्त विचारांचे आंदोलन त्यात महिलांचा सहभाग कायम नोंदविला आहे.

धार्मिक परंपरांमध्ये स्थान मिळविण याची परिणीती म्हणजे आपल्याच स्वातंत्र्यावर गदा हे लक्षात घेतलं पाहिजे. स्वत:ला परंपरांमध्ये जखडून घेणं आणि पुन्हा स्त्रीमुक्तीचा दुराभिमान याला काही अर्थ नाही. तेव्हा स्त्रीमुक्ती म्हणजे नक्की काय याचा अर्थ नीट समजलं व तो उमजला पाहिजे. कुटुंबाच्या चौकटीतून स्त्रीने बाहेर पडणं, कामगार म्हणून पुढे येणं ही आधुनिकता आहे.

या असंघटित क्षेत्रात स्त्रियांना कोणतंही कायद्याचं संरक्षण नाहीये. महिलांना अधिकार, संरक्षण मिळवायचे असेल तर त्यांना एकजूट होणं गरजेचं आहे. याचा पाया हा कोणत्याही मध्ययुगीन कल्पनांवर आधारित न राहता स्त्री-पुरुष समानतेवर आधारित असावा. म्हणून तिचे सक्षमीकरण होताना याचा विचार करावा.

शिक्षणाने विचारांच्या कक्षा रुंदावत असताना परंपरा आणि रूढींना चिकटून आलेली पुरुषी मानसिकता स्त्रीच्या अस्तित्वाच्या खुणा वारंवार दाखवून देते.

स्त्री ही कशी असावी, त्या चौकटीतच तिची जडणघडण व्हावी म्हणून सामाजिक, सांस्कृतिक घटक कार्यरत असतात. तिच्यावर कौटुंबिक प्रतिष्ठेचा डोलारा टाकून जगण्याचे स्वातंत्र्य बहाल केले जाते. घरात कामाच्या ठिकाणी अशा प्रत्येक ठिकाणी स्त्रीची पुरुषी अहंकाराकडून अवहेलना करण्याचा प्रयत्न होत असतो. स्त्री व पुरुष एकमेकांना पूरक घटक आहेत. पण तरी त्यांच्यात भेद निर्माण केलेत.

स्त्री मुक्ती म्हणजे स्त्रीची गुलामगिरीतून, अत्याचारापासून, गरिबीतून,

दुबळेपणातून, परंपराच्या जोखडातून की पुरुषांच्या मक्तेदारीतून आणि ही मुक्ती करायला तिला कोणी अडवले नाही; मात्र हे सक्षमीकरण एकांगी असू नये हे मान्य व्हायला यासाठीच समाजाने तिच्यासोबत उभं राहायला हवे. तिच्यावर होणारे अमानुष अत्याचार, कामाच्या ठिकाणी होणारा अन्याय व हे कृत्य करणाऱ्याला कडक शासन व्हायला हवे. सुरूवात कुटुंबापासून व्हायला हवी.

केवळ राहण्याचं, खाण्याचं नाही तर निर्णय घेण्याचं स्वातंत्र्यही मिळायला हवं. कायद्याआधी आपण सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी पावले उचलायला हवीत. समानतेचा विचार कृतीतून झिरपला तर स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारासाठी निषेध करण्याची पुन्हा पुन्हा वेळ येणार नाही.

**कोमल है कमजोर नहीं तू**
**शक्ति का नाम ही नारी है!**
**जग को जीवन देने वाली,**
**मौत भी तुझसे हारी है!**

❑

# माझ्या विकासातील अडचणी

**■ लीला दाभाडे**

मी श्रीमती लीला रवींद्र दाभाडे. माझे आधीचे नाव लीला महादेव मारणे. माझा जन्म खरावडे गावी ५ जून १९७१ रोजी झाला. मला दोन भाऊ,तीन बहिणी आहेत. वडीलांचा गावी दुधाचा व्यवसाय होता. आई गृहिणी होती. आईचे सततचे आजारपण चालू असायचे. त्यातच वडिलांची ४० जनावरे गेली. त्यानंतर आईचे पण निधन झाले. त्यावेळेस मी १२/१३ वर्षांची होते. वडिलांना आजीची साथ होती. त्यामुळे वडील पुण्यात आले. आम्ही सर्व भावंडे लहान होती. त्यातच माझे आजारपण चालू झाले. मला तीन महिने दवाखान्यात ठेवले होते. वडिलांनी हमाली काम चालू केले होते. त्यातच वडिलांनी दुसरे लग्न केले. त्यानंतर मी बरी झाल्यावर माझे ८८ साली रवींद्र दाभाडे यांच्याशी लग्न झाले. लग्न झाल्यावरचे काही दिवस खूप चांगले चालले होते. सासर चांगले होते मला दरवणे गाव पण आवडायला लागले. मी संसारात रमू लागले. माझे मिस्टर रिक्षाचा व्यवसाय करत होते. मला पहिला मुलगा समीर झाला त्याच्या पाठोपाठ सचिन झाला. पहिले काही दिवस पुण्यात राहिल्यावर परत गावी गेले. दोन मुलांना वाढवणे मला गावी कठीण झाले. कारण माझ्या मिस्टरांना दारूचे व्यसन लागले. त्यामुळे घरची परिस्थिती बिघडू लागली त्यामुळे पुण्यात आले. शेजारच्या बायकांच्या ओळखीने धुणी भांडी ही कामे करू लागले. काही मैत्रिणी मिळाल्या त्यांच्या कडून अन्नपूर्णा संस्थेची माहिती मिळाली. मग मी मुलांच्या शिक्षणासाठी १०००/- रु. चे कर्ज जुन्या अन्नपूर्णाच्या ऑफिसमधून घेतले. दोन्ही मुलांना शिक्षण देता देता मला बरेच वेळा कर्ज काढावे लागले. घरून मिस्टरांची साथ मिळत नव्हती. अन्नपूर्णाचे दोन हप्ते थकले. मग बचतीमधून भरले. माझे मिस्टर खूप आजारी होते. मोठ्या मुलाची १२ वी ची फी लहान मुलाची I T I ची फी. हे सगळं एकदम आल्याने मी हप्ते भरले नव्हते. तेव्हा अन्नपूर्णातून बाहेर पडले. पण नंतर परत दुसऱ्या गटात सामील झाले. त्यानंतर माझ्या मिस्टरांचे निधन झाले. त्यावेळेस अन्नपूर्णा संस्थेनी मला १०००/- रु. ची मदत केली. वेळोवेळी आनंदाच्या, दु:खाच्या प्रसंगात अन्नपूर्णाची साथ मिळाली. माझा मोठा मुलगा B.Com व धाकटा I T I झाला. मोठा मुलगा चांगल्या नोकरीला लागला त्याचे लग्न झाले. त्याला १ मुलगी आहे व धाकट्या मुलाचे पण लग्न झाले. त्याला पण १ मुलगी आहे. धाकट्या मुलाचा गाडी भाड्याने देणे. तसेच G.C.B. रिपेयर करण्याचा व्यवसाय आहे. बघता बघता दिवस पालटले गेली २३ वर्षे मी घेतलेल्या कष्टाचे फळ मिळाले स्वत:चे घर झाले. नाती आल्या. दिवस चांगले जाऊ लागले. मला कधी वाटले पण नव्हते की मी चौथी शिकलेली बाई एक दिवस अन्नपूर्णाची G.C.B झाले. वेळोवेळी अन्नपूर्णाच्या मेघाताईंचे मार्गदर्शन व मदत मिळाल्याने मी माझे जीवन चांगल्या प्रकारे घडवू लागले. अशीच साथ इथून पुढे मिळावी ही आशा करते. धन्यवाद!

❑

# माहेरची माया

■ दीक्षा गोरे

"आई गेली आणि खऱ्या अर्थाने माहेर संपले" ती जोपर्यंत असते कौतुक असते आराम असतो. एक प्रकारचा निवांतपणा असतो, तिच्यावर आपली मुले सोपवून बहिणीबरोबर, मैत्रिणींबरोबर, गप्पांचे फड रंगतात. भटकणे सुरू होते. एक स्वातंत्र्य असते. ते कुठेतरी हरवले हे मात्र खरे, आई गेली आणि त्या दिवशी "हे माहेर" संपले. सुट्टीला घरी आले की आवडणारा पदार्थ आवर्जुन करणारी आई... तुपाची/लोणच्याची आवडत्या गुळांब्याची वरणी जढून बाजूला काढून ठेवणारी आई... उशिरापर्यंत हाका न मारणारी आई..."झोपा ग आता खुसूखुसू करत बसू नका..." असे सांगणारी आणि अगदी अलगदपणे आपल्यामध्ये सामील होणारी आपली आई...

दुपारच्या सुख-दु:खाच्या गप्पा... त्यातसुद्धा संसाराचे महत्त्व समजावून सांगणारी आई...

तडजोडी करूनच संसार करावा लागतो तरच तो आनंदाने होतो नाही तर नाते तुटते. ते आपल्याला टिकवायचे आहे. तोडायचे नाही असे सांगणारी आई संसारात मन शांत ठेवावे. भांडण तंटा झाला तर विसरून जावा....

नवऱ्याचे चार चांगले गुण लक्षात ठेवावे आणि आपल्या चांगल्या वागण्याने हळूहळू माणूस बदलतो हे शिकवणारी आई... दुपारी जेवण झालं की आडवे हो सांगणारी आई...

मुलाला वाढवताना कसे वाढवावे हे शिकवणारी आई दुपारी गप्पा मारता मारता तिच्या पोटावर हात ठेवून झोपताना एक प्रकारच्या शांततेचा मी अनेकदा अनुभव घेतलेला आहे... तिची कितीतरी रूपे आहेत...

त्यानंतर हळूहळू संसारात रमायला सुरुवात झाली आणि 'माहेर' ही जाणीव कमी होत गेली. कदाचित स्वीकारले असेल मनाने. ती गेली आणि तिच्या बरोबर इतकी वर्षे असणारी मावशी, मामा, भाऊहि माहेरची म्हणून आपली असणारी नातीही गेली... पुसली गेली आपल्या आयुष्यातून तीच्यामुळे जोडलेली होती तिच्या जाण्याने ती नाती पण कुठेतरी हरवली आणि मागे राहिले एकटेपण जे दरवर्षी सुट्टी लागली प्रकर्षाने जाणवायचे. आजूबाजूच्या मैत्रिणी, मुली-बाळी माहेरी जाताना बघून आत कुठेतरी तुटायचे... वाईट वाटायचे आपल्याला असे ठिकाण राहिले नाही म्हणून वाईट वाटायचे.

परंतु हळूहळू माणुस सगळ्या गोष्टी स्वीकारतो. मुले मोठी झाली की आपल्यालाही त्याची सवय होऊन जाते. आता मे महिन्याला जाणवणारा एकटेपणा माहेर नसल्याचे दु:ख कमी झाले आहे. तरी सुद्धा कुठेतरी आत त्याचा सल आहेच. लाड करून घ्यायला वयाची अट नसतेच मुळी, पण प्रत्येकाला एक हक्काचे माहेर मात्र असावे असे मला कायम वाटत आले.

तो जिव्हाळा, आपलेपणा, कौतुक, आराम, कुठे तरी हवाहवासा वाटत असतो. उन्हाळ्याच्या सुट्टीतला हा आनंद हरवलाय एवढेच मात्र खरे...

मामाच्या गावाला जाऊया ही संकल्पना हळूहळू लुप्त होऊ लागलीय.

"माहेरी गेले होते महिनाभर" हे कुणाला तरी आनंदान सांगायचे राहून गेले... आहे कित्येक वर्षात... मम्मी Miss U...

❐

# भारत-सुजलाम् सुफलाम्

■ **आरती पवार**

आपल्या देशाबद्दल कोणताही विषय बोलण्यात आला तरी अभिमानाने छाती भरून येते. आपल्या भारत देशात ज्ञान-विज्ञान परिपूर्ण प्रमाणे दिले गेले आहे. पण ज्या प्रमाणे पूर्णपणे विकास होण्याची गरज आहे.

तो मात्र अजून झाला नाही.

पण भारत एक महान राष्ट्र बनण्याची पूर्ण काबीलियत आहे. पण...

आपल्या भारत देशात २० व्या शतकात मोठ्या प्रमाणात गरिबांचे गरिबीचे प्रमाण जास्त होते. पण आता भारत स्वातंत्र्य होऊन ७० वर्षे होऊन गेली तरी म्हणावी तशी सुधारणा झाली नाही.

सध्याच्या अवस्थेत आपण पाहतो. भ्रष्ट्राचार व काळा पैसा याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. ते जर कमी झाले तर...

सध्या स्विस बँकेत पैसे गुंतवण्यामध्ये भारताचा ७३ वा नंबर येतो.

सध्याच्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत बोलायचे तर येणाऱ्या ५ वर्षांत एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम मोठ्या प्रमाणात उलाढाल भारताची असणार आहे. असे शब्द शासनाचे सतत कानावरती येताना दिसतात. पण ते सर्व कागदावरती दाखविण्यासाठी नसावे तर सत्यात उतरविण्यात यावे.

महिला यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुली यांनी जन्म घ्यायचा की नाही तेथूनच यांची दुरवस्था चालू होते.

यातूनच मुलगी जन्माला आलीच तर ती लैंगिक शोषण, लैंगिक शिव्याशाप, घरगुती हिंसाचार, अत्याचार, छळ, मारहाण इथूनच सुरुवात ती मृत्यूनंतर संपते. यामुळेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

मला असे वाटते मुलींचा जन्म होताच ढोल ताशांच्या गजरात तिचे स्वागत व्हावे. तर भारत मुलींच्या विकासाच्या दिशेने जात आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

कुमार अवस्थेतील समाजात वयाच्या ८ वर्ष ते १८ वर्षाच्या कुमार अवस्थेतील मुले आत्महत्या करत आहेत. इतकी बिकट अवस्था या कुमार अवस्थेतील मुलांची आहे. इतक्या लहान वयात व्यसन करणे. या मुलांकडे पालकांचे दुर्लक्ष, अशा असंख्य त्रासाखाली मुले जगत आहे.

यासाठी शासनाने यांचे प्रॉब्लेम समजून घेणे त्यांच्यासाठी शैक्षणिक योजना कशा सोप्याकरून त्यांच्या पर्यंत पोहचविता येतील याचा विचार करायला हवा. तरुण मुले - समाजातील वाढती बेरोजगारी यामुळे तरुण मंडळी पैसे कमविण्यासाठी वाटेल त्या चुकीच्या मार्गाचा वापर करीत आहेत.

त्यामुळे त्यांचा संपूर्ण भविष्यकाळच अंधारात चालला आहे. आपल्या भारत देशात ४२% टक्के प्रमाण हे तरुण मुले-मुली यांचे आहे. १८ ते २५ या वयोगटातील भारत देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्नार्थ असणारी पिढी हीच खचत चालली आहे. हे फार मोठे भीषण आहे.

त्याच्यासाठी भारतातील कायदा सुव्यवस्था मोठ्या प्रमाणात भक्कम होण्याची गरज आहे. ज्यामुळे व्यसनाधीनता अपराध वाढणार नाही.

तृतीयपंथी - यामध्ये एक नवीन ओळख असलेले म्हणजे तृतीयपंथी हे कोणी माणसांपेक्षा वेगळे नाहीत. माणूसच आहेत. यांना समाजात गरज आहे ती नव्याने चांगली आणि ठामपणे जगण्याची ओळख देण्याची, पण आपला समाज यांच्याकडे सतत विचित्र नजरेनेच पाहिले जाते. यांना शासनाने स्वत:चा उद्योग-व्यवसाय मोठ्या प्रमाणात उभा करून देण्याची गरज आहे. यानंतर शासनाने यांना स्वत:ची हक्काची घरे बांधून द्यावीत.

वृद्ध अवस्थेतील स्त्री-पुरुष समाजात ३२% लोक वृद्ध आहेत यांच्याकडे जर पाहिले तर अतिशय वाईट अवस्था आहे. सध्या आपल्या देशातील वृद्धांची मुले गरीब असो किंवा श्रीमंत-गरीब असतील तर रस्त्यावरती सोडतात. श्रीमंत असतील तर वृद्धाश्रमात लोकांसाठी शासनाने विशेष उपाय योजना करणे.

उदा. ज्यांचे वय ७० त्यांना शासनान स्वत:च्या खर्चातून दर महिना २००० रु. देणार यातून त्यांना वयोवृद्ध म्हणून मानाने वागविले जाईल.

ज्या दिवशी रात्री २ वाजता एक स्त्री एकटी रस्त्याने सुरक्षित घरी जाईल त्या दिवशी समजावे भारताचा विकास होत आहे.

ज्या दिवशी शेतकरी आनंदाने सुखी आणि समृद्ध आयुष्य जगत आहे. असे दिसेल त्या दिवशी समजावे की भारताचा विकास होत आहे.

ज्या दिवशी भारत देशातील अस्वच्छता बंद होईल आणि सर्व ठिकाणी निसर्ग रम्य वातावरण दिसेल त्या वेळी समजावे भारताचा विकास होत आहे.

जात–धर्म या गोष्टी कागदावरतीच लिहून चालणार नाही तर ज्या दिवशी एक हिंदू आपल्या मुलीचे लग्न मुस्लीम मुलाशी करताना आनंदात करेल त्या वेळी समजावे आपल्या भारताचा विकास होत आहे.

आपल्या भारत देशात शोधूनही कोणी भिकारी सापडणार नाही. त्या दिवशी समजावे की आपल्या भारताचा विकास होत आहे.

काय चांगले, काय वाईट. आपण इथे माणूस म्हणून जन्माला आलो, आपणही याचे एक देणेकरी लागतो.

❐

---

१५ ऑगस्ट १९४७ च्या निमित्ताने मत मांडता येते. त्यासाठी सर्व अन्नपूर्णा संस्थेचे अभार.

महिला म्हणून सर्व महिलांना स्वातंत्र्य मिळाले आहे का? आजच्या परिस्थितीत मला असे जाणवले की, मी आणि माझ्या तीन मुली आहोत. पुरुष आमच्या सोबत राहत नाही. म्हणून लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन इतका विचित्र असतो. परत कुठेही गेलो तर तुम्ही काय किंवा मुलींना वडील आहे का? काय करतात?ते कुठे आहेत? असे प्रश्न करतात. मुली शिकतात ते स्वत:च्या हिमतीवर काही करण्यासाठी जातात पण त्यांना असे जाणवते. की आम्हाला स्वातंत्र्य दिले म्हणतात. पण प्रत्येक व्यक्तीच्या वागण्यातून असे जाणवते की नाही अजून महिलांना स्वातंत्र्य मिळालेच नाही. आमचे अनुभव सांगतानाही बरे वाटत नाही. आरक्षण मिळाले म्हणून सांगतात. पण काही नाही. प्रत्येक पुरुष स्वार्थानेच मदत करतो. जेव्हा त्यांचा स्वार्थ पूर्ण होताना दिसला, की त्याचा स्वभाव कळतो. म्हणून मी तर म्हणेन प्रत्येक महिलांबद्दल पुरुषांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलत नाही तोपर्यंत महिलांना स्वातंत्र्य मिळत नाही.

**■ निता नंदकिशोर पगारे, बॅच नं. १ दापोडी, पुणे.**

---

एक महिला म्हणून आधी घरांतून आदर मिळाला पाहिजे, प्रत्येक घरात मुलीप्रमाणेच सुनेचा पण आदर केला पाहिजे. तिचे मत गृहीत न धरता तिलाही छोट्या मोठ्या निर्णयात सामील करून घेतले पाहिजे आणि पहिल्यादा प्रत्येक महिलेने अन्यायाविरुद्ध बोलले पाहिजे. डोळे उघडे ठेवूनच समाजाकडे सकारात्मकतेने पाहिले पाहिजे आणि स्वत: आनंदी राहून दुसऱ्यांना आनंदी ठेवले पाहिजे. घरांतील व्यक्तीची काळजी घ्यावी आणि स्वत:च्या आवडीप्रमाणे एखादा छंद जोपासावा आणि स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. प्रत्येक महिलेने व्यक्त व्हायला शिकले पाहिजे. प्रत्येक महिलेला बोलण्याचे स्वातंत्र्य पाहिजे. जगता आले पाहिजे. प्रत्येक स्त्रीने कुटुंबासाठी जगता जगता स्वत:साठी ही जगता आले पाहिजे. स्त्रीने स्त्रीचा आदर केला पाहिजे. स्त्री-पुरुष समानता आहे असे म्हणतात पण विचार केला तर स्त्रीला अजूनही समानतेची वागणूक मिळत नाही. तर प्रत्येक स्त्रीला समान अभिव्यक्ती स्वत:चा मताचा अधिकार पाहिजे. तिला बोलते केले पाहिजे आणि तिच्या हक्कासाठी लढायला प्रवृत्त केले पाहिजे. एक तरी छंद जोपासला पाहिजे.

**■ भाग्यश्री समीर गायकवाड, बॅच नं. ३, पुणे.**

मी संगीता राजपूत एकदा माझ्याबरोबर भरपूर वाईट घटना घडली. माझे लग्न २००७ मध्ये झाले. मला एक मुलगी आहे ती २००८ मध्ये झाली. पण त्यानंतर माझे मिस्टर विपुल राजपूत ह्यांचे निधन झाले २००९ मध्ये. पण मी माझ्या मुलीकडे बघून जगण्याची आशा ठेवली. पण त्यामध्ये माझे सासू सासरे भरपूर छळ करत होते. मला घरातून निघून जा राहायचे नाही. नवरा नसताना माझा त्यांनी भरपूर छळ केला. कामाला जायचे नाही. चांगले कपडे घालायचे नाही. कोणाबरोबर बोलायचे नाही का? तर माझा नवरा नाही. अरे पण ते असताना जगणे जगणे होते. ते नसताना का नाही. मला तर जगावे लागणार माझ्या एका मुलीसाठी, मला असे बोलायचे आहे की, मी एक महिला तशा अनेक महिला आहेत. माझ्या सारखा पण असा छळ नको आम्हाला, पण अशा आहे की आमच्या मुलांसाठी आम्ही पण या जगात नीट राहवू. साबरू. अन्नपूर्णाच्या विद्यापूर्णा मिटिंगमध्ये मला बोलण्यास भेटले. भरपूर काय बोलायचं पण काय काय नाही. जे जीवन आहे ते चांगले आहे असे बोलून माझा लेख थांबवते.

**■ संगीता राजपूत, ब्रँच ३ मुंबई**

आज २१ व्या शतकामध्ये स्त्री-पुरुष समानतेचा नारा पुकारला जातो. परंतु किती स्त्रियांना स्वातंत्र आहे हे जाणून घेण्याची खूप गरज आहे. आज कितीतरी स्त्रिया, कुमारिका या वास्तविक जगामध्ये एकट्या फिरु शकत नाहीत. रोज एकतरी अत्याचाराची बातमी पहायला किंवा ऐकायला मिळते. स्त्रीने आकाशात भरारी मारली तरीही तिला तिच्या मनाप्रमाणे जगता येऊ नये. ती पदोपदी वासनेची बळी पडते का? या गोष्टीचा आज सर्वांनीच विचार करणे खूप गरजेचे आहे. स्त्रीला स्वतंत्र तरी नेमकं काय हवं असतं हो. ती पुढे गगनभरारी घेण्यासाठी उंच उडण्याचा प्रयत्न करते तेव्हा तिच्या जवळच्या माणसांसाठी/ समाजांनी तिला उंच उडण्यासाठी प्रोत्साहित करावे एवढीच तिची अपेक्षा असते. परंतु या युगामध्ये एवढी साधी अपेक्षा पूर्ण होऊ नये?

**■ वनिता जाधव, ब्रँच ६ मुंबई**

आजादी हर महीला का हक है, और आज हर महिला को वह हक मील भी रहा है, आज वह अपनी पढाई पुरी सर सकती है, और उसे जो बनना है वह बनसकती और जीस के घर में बेटे नही है वहा भी महिलाए अपने परिवार को Support करती है, आज महिलाए अपने पैरो पर खडी होकर अपने लिए अपने परिवार के लिए बहुत कुछ कर सकती है, मुझे भी महिला होकर अपने हक के लिए और जो मै अपने बच्चो के लिए करना चाहती हूँ, उसका मौका मिला, और आगे भी मैं चाहती हुं के अपने परिवार के लिए जो बहतर है, वह काम करने के लिए मुझे रोका टोका नही जाए।

**■ शोहरत शेख, ब्रँच ९ मुंबई**

मी एक महिला आहे. त्याचा मला अभिमान आहे आणि हेच माझे स्वातंत्र्य आहे.

हे मी नारी आहे. ना जाने किती मोठे मोहक रिश्तो को अपने आंचल में बांधे ढूढती हू खुद को जी हा और क्या आपका है अपने अप से यह

रुहानी रिश्ता नारी एक सम्मान है
नारी एक सुंदर कविता आहे नारी

परिवर्तनाचे धाडसी पाऊल आहे नारी एक श्रद्धा आहे आणि मी नारी आहे
त्याचा मला अभिमान आहे -

**■ माधुरी दुबळे, ब्रँच ५ मुंबई**

मी जयश्री वि. खरात. अन्नपूर्णाची गेली अनेक वर्षापासूनची सभासद आहे. माझ्या नवऱ्याचा मृत्यू होऊन आता सहा वर्षे झाली आहेत. मला दोन मुले आहेत. एक मुलगा आणि एक मुलगी. मी माझा नवरा हयात असल्यापासून नोकरी करते. त्यांच्यानंतर तर नोकरी करणे फार गरजेचे ठरते. अशा वेळी माझ्या कुटुंबाने मला मानसिक आधार दिला त्यामुळे मी धीराने काम करण्यास उभी राहू शकते. अशा वेळी शिक्षणाचा फायदा मला झाला व शिक्षणाचे महत्त्व काय असते ते अशा वेळी समजते. आता मी बऱ्यापैकी सावरलेली आहे व पुढच्या भविष्यात माझ्या मुलांच्या शिक्षणावर भर दिला आहे. स्वातंत्र्य मिळत नाही. ते मिळवावे लागते. स्वत: प्रयत्न केल्याशिवाय तुम्हाला कोणी स्वातंत्र्य देऊ शकत नाही. त्यामुळे महिलांना कोणते स्वातंत्र्य मिळायला पाहिजे ऐवजी कोणते स्वातंत्र्य त्या स्वत:हून मिळवतात हे महत्त्वाचे ठरते. शिक्षण घेऊन तुम्ही १०० पुरुषांत बोलण्याचे व सगळ्यांसोबत धीराने व अभिमानाने काम करण्याचे स्वातंत्र्य तुम्ही स्वत: मिळवू शकता. तो धीर मला माझ्या शिक्षणाने व कामाच्या जिद्दीने मिळवून दिला आहे. त्यामुळे महिलांना स्वत:च खंबीर बनून हा लढा लढायचा आहे. अन्नपूर्णाची मी आभारी आहे की त्यांनी मला माझ्या मनातील भावना व्यक्त करण्यास संधी उपलब्ध करून दिली.

**■ जयश्री खरात, ब्रॅंच ३ मुंबई**

आजकालच्या महिलांना भरपूर स्वातंत्र्य मिळाले आहे. महिला दिवसभर घराबाहेर राहावू शकतात. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कामे करतात. कोणत्याही कामामध्ये महिलांचा हात कोणीच धरू शकत नाही. संपूर्ण घराची, आपल्या मुलांची जबाबदारी महिला सहजपणे स्वीकारतात.

कितीही कष्ट केले तरीही काही महिलांना पूर्ण स्वातंत्र्य मिळतच नाही. आजही महिला पुरुषांबरोबर कामे करतात. परंतु त्या त्यांच्याशी बोलू शकत नाहीत. कारण कोणी पाहिले तर नावे ठेवतील ही भीती त्यांच्या मनात असते. याचा अर्थ असा नाही ती महिला वाईट आहे. पण बघणाऱ्यांची नजर वाईट असते. प्रत्येकाची आवड-निवड वेगळी असते. पण महिलांना स्वत:च्या आवडीने राहता येत नाही. लहानपणी आई-वडील व लग्न झाल्यावर  नवरा. एवढेच महिलांचे आयुष्य असते. सगळ्यांची मने सांभाळत महिला संसार करते. पण तिच्या मनाचा विचार कोणीच करत नाही. आपल्या मुलांसाठी ती कष्ट करते. पण तिच्या कष्टाची किंमत त्या मुलांनाही नसते. महिलांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागणार आहेत.

**■ मिनाली साळवी, ब्रॅंच १५ मुंबई**

मला वाटते की या जगात महिला आज कितीही पुरुषांपेक्षा पुढे असल्या तरीही काही जण, काही समाज एका महिलेला जो आदर दिला पाहिजे तो दिला जात नाही, घरात बायकोला, तर ऑफिसमध्ये लेडीज स्टाफला, नेहमी तिला कमी लेखले जात, बाई एकटी असेल तर लोकांची तिच्याकडे बघण्याची नजरच वेगळी असते. असा का? हे बदलेले पाहिजे.

एकटी बाईसुद्धा मानाने व निडर बनून राहू शकली पाहिजे, हे स्वातंत्र्य पाहिजे.

आज मी माझ्या तीन मुलांसोबत एकटी राहते. पण तरी सुद्धा कुठेतरी मनात भीती असते. मी घरात नसताना माझ्या मुलांकडे कोणी वाईट नजर टाकेल का? कोणी काही तरी करेल का?  आपले शेजारी जर चांगले असतील तर आपण थोडेशे बेफिकीर होतो, पण तेही जर नसतील तर खूप चिंता वाटते. नवरा नसेल तर त्या बाईला सगळे वाकड्या नजरेने बघतात, ती कोणाशी मोकळ्या मनाने बोलू शकत नाही, कुठे एकटी फिरू शकत नाही. कारण हा समाज तिला लगेच नावे ठेवतो, हे सगळं बंद झालं पाहिजे.

तिलाही जगण्याचा अधिकार आहे, तिलाही स्वातंत्र्य पाहिजे.

**■ निर्मला घोष, ब्रॅंच १५ मुंबई**

# भारताचा स्वातंत्र्य लढा

१५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत देशात सौंदर्य उजळून आल्यासारख वाटले असेल असे मला वाटते. आपणाला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले नव्हते तेव्हा स्वातंत्र्य मिळण्यासाठी आपल्या पूर्वजानी खूप चळवळ केली. स्वत:चा प्राणही घालवला. उदा. महात्मा गांधी, जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच नव्हे तर अशा खूप समाजसुधारकांनी आपले प्राण बलिदान केले. आज जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा असे वाटत की आपल्यावरचे बंधन नष्ट झाले. ज्या काळी स्त्रियांना ''चूल आणि मूल'' हेच होते. पण आता हे सर्व बदल. आता आपणाला स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा मिळवून जाताना दिसतात, ह्या स्वातंत्र्याचा स्त्रियांना खूप उपयोग झाला, असे अवश्य म्हणता येईल.

स्त्रिया कुठेच कमी पडल्या नाहीत. कुठे कलेक्टर, डॉक्टर, इंजिनीयर अशा सर्व क्षेत्रांत महिला अवश्य दिसतात. याचा प्रत्येक स्त्रीला अभिमान वाटत असेल.

**■ सोनिया शिरकुल, ८ वी**

१५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्य मिळाले आपल्याला. स्वातंत्र्य मिळायच्या आदी आपल्यावर ब्रिटिशांचे राज्य होते. आपल्यावर ब्रिटिश खूप अत्याचार करायचे. आपल्याला स्वातंत्र्य मिळत नव्हते तर आपल्याला स्वातंत्र्य मिळावे म्हणून आपल्यासाठी खूप जणाने बलिदान दिले गांधीजी आपल्यासाठी लढले. आपल्याला स्वातंत्र्य दिले. गाधींजीने खुप लढे लढले होते. गांधीजीला लाला लजपत राय, पंडित जवाहरलाल नेहरू या सगळ्यांनी मदत केली. गांधीजीने इतके लढे लढून आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला गांधीजीने स्वातंत्र्य दिले म्हणून आज आम्हाला आभिमान वाटतो की आपल्या पूर्ण स्वातंत्र्य भेट म्हणून सगळ्यानी आपल्या भारताचे नाव कमवले पाहिजे. अभिमान वाटला पाहिजे सगळ्यांना.

**■ श्रद्धा लहु बळी, ९ वी**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले व त्याचबरोबर मुलींना शिक्षण देणे व शिक्षण मिळालेच पाहिजे यावरही विषय मांडण्यात आला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सर्व जात, पात, धर्म एकत्र आले व एकत्र एकजुटीने सण साजरा केला जातो. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे सर्व लोक आज पुढे व आनंदी राहतात. भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी अशा थोर, महान लोकांनी स्वत:च्या जिवाची काळजी न करता भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले व आज लोकांच्या सर्व गरजा पूर्ण व्हाव्यात असे सर्व उद्योग उपकरण आज आमच्या भारतात उपलब्ध आहे.

आज LIC जिथून आपण कर्ज काढणार आहोत. तिथेही खूप मदत करण्यात येते. आज शिक्षणासाठी पैशांची गरज पुरवली जाते आणि शिक्षणही सुरळीत चालू असते. गरीब लोकांसाठी खूपच छान संस्था उपलब्ध केल्या गेल्या आहेत. हे सर्व भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून करण्यात आले आहे.

मला खूपच आनंद होतो की, आज गरीब लोकांच्या सर्व गरजा पुरवण्यात येत आहेत आणि त्याही वेळेवर, त्यामुळे मला माझ्या भारत देशावर आणि त्या थोर पुरुषांवर खूप गर्व वाटतो की भारत देशात माझा जन्म झाला.

**■ आरती सुनिल ढाळे, १२ वी**

१५ ऑगस्ट १९४७ को हमारे देश को आजादी मिली थी। हमारे महान वीर देशभक्तो ने इस आजादी की लडाई में अपने प्राणो की बाजी लगा दी. महात्मा गांधी, लाल बहादुर शास्त्री, भगत सिंघ, जैसे वीरो ने आजादी की लडाई में भाग लिए. Pandit Jawaharlal Nehru हमारे देश के पहले प्रधान मंत्री थे। इनके कठीन प्रयासो से हमारे देश को अंग्रेजी सरकार से मुक्ती मिली. इस लिए हम बडे धूम-धाम से १५ ऑगस्ट का त्योहार मनाते है। इस दिन हम हमारा राष्ट्रगान ''जन-गन-मन'' गा कर हमारा राष्ट्रीय ध्वज लहराते है। यह दृश्य देखकर मेरा सिना गर्व से चौड़ा हो जाता है। मुझे गर्व है की में भारत माँ का बेटा हुँ। मुझे मेरे भारत देश पे अभिमान है। सन २६ जनवरी १९५० को हमारा राष्ट्रीय संविधान स्थपित हुआ था। मुझे मेरा देश बहुत प्यारा है।

**■ अक्षय वासवानी, १२ वी**

१५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्य मिळाल आहे. पण भारतात आपल्या महिलांना स्वातंत्र्य मिळाले नाही. आज मुली, महिला यांच्या वर किती अन्याय झाले. महिलांना, मुलींना, मानसावाणी स्वतंत्र मिळाले. आजकाल मुलांना १० वाजल्याच्या नंतर पण फिरू शकतात पण मुली कामावरून येत असेल तरी दुनिया तिला भलती सलती नावे ठेवतील. पण पूर्वीच्या काळात मुलीना शिकायला नव्हते. बायकांना अक्षरश: चितेत उडी मारायला लागायची. पण मध्ये तर काळ एवढा पुढे गेला की मुली, बायका २०१८ कामावरून २ वाजता बाहेर येतात. आजचे मुली तर मुलापेक्षा पण पुढे गेले. तरी काय डॉक्टर झाले. पायलेट झाले. तरी पण मुलींना सुरक्षा नाही. आज ५०% टक्के मुली कुठेच कुठे गेली. तरी पण महिना ५०% सुरक्षा भरत नाही. म्हणून मुलींवर अत्याचार होतात ते थांबवले पाहिजे.

**■ गिरीश चिपकर, १०वी**

भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपण सर्वांनी लढले पाहिजे. आपल्या सर्वांना स्वातंत्र्याने जगायला मिळाले पाहिजे. आपण स्वतंत्रपणे राहिले पाहिजे. हा अधिकार आपल्याला मिळाला पाहिजे आपण सर्वांनी स्वतंत्रपणे जगण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. हा हक्क आपण सर्वांनी मिळवलाच पाहिजे. आपण सर्व भारतीय आपल्या भारतासाठी काहीतरी करायला पाहिजे असे वाटत नाही का तुम्हाला. सर्व नागरिकांना असे वाटलं पाहिजे की आपण आपल्या आपल्याला मिळाले पाहिजे. म्हणून मी म्हणते की भारतासाठी काही तरी करा. आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले आपल्याला अजून स्वातंत्र्य मिळाले नाही. आपण आपल्या आई, बहिण, मुली आपल्या घरातच नाही तर भारतात त्यांना स्वातंत्र्य मिळून द्या, मुलींना स्वातंत्र्य मिळून देणे आपल्याच हातात आहे. आपण जर त्या मुलींना चांगल्या नजरेने पाहिले तर त्या मुलींना पण किती छान वाटेल की आपला भारत स्वतंत्र झाला आहे. आपण स्वातंत्र्यपणे भारतात फिरू शकतो. हा लढा आपल्यालाच भारतातील स्त्रियांसाठी लढावा लागेल.

तुम्ही भारतात चांगल्यापणाने राहाल तरच आपला भारत देश स्वतंत्रपणे राहिल आणि मी शेवटी एकच सांगते की आपल्या भारताचे स्वतंत्र टिकवण्यासाठी मी काही पण करू शकते. भारतासाठी मी लढायला काय मरायला पण कमी नाही करणार.

**■ प्रियंका लवटे, १०वी**

आपल्याला १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाले म्हणून मुली शिकू शकल्या सावित्री फुले घ्या मुलींसाठी लढल्या नसत्या तर मुलींना शिक्षण करता आले नसते. मुली शिकल्या म्हणून त्यांचा परिवार शिकतो. महिला या शिकल्या नसत्या तर त्यांचे परिवार शिकले नसते. सावित्री बाई आणि ज्योतिराव फुले ह्यांच्या मुळे मुली शिकू शकल्या. म्हणून आम्ही सर्व मुलींनी शिक्षण घेतले.

''मुलगी शिकली प्रगती झाली''

**■ सिद्धी नवनाथ खरात, ९ वी**

भारताला स्वातंत्र्य मिळून खूप वर्षे झाली. त्यासाठी आपल्या देशातील खूप होतकरू लोकांनी स्वत:च्या प्राणांची आहुती दिली. उदा. म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू तसेच यासाठी स्त्रियाही सहभागी होत्या. त्यामध्ये सरोजिनी नायडू, सुस्मिता सेन वगैरे. तसेच सावित्री बाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. ती शाळाही पुण्यात सुरू करण्यात आली. त्यामुळे 'पुणे शहराला' ही 'विद्याचे माहेरघर' म्हणून ओळखले जाते. पण काही ठिकाणी अजूनही स्त्रियांना तेवढे स्वातंत्र्य दिले जात नाही. त्यासाठी आपण त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आपण म्हणतो की, भारत स्वतंत्र झाला. पण खऱ्या अर्थाने जेव्हा आपण स्त्रियांना तेवढेच महत्त्व देऊ, तेव्हा म्हणता येईल की भारत स्वतंत्र झाला. त्यासाठी मुलींनी कधीही मागे वळून पाहू नये.

**नारी तू घे अशी उंच भरारी । फिरून पाहू नको, माघारी**

**■ निकिता रमेश चोरघे, १२ वी**

१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले ह्याचा मला आनंद आहे आणि ज्यांनी आपल्या भारतासाठी आपल्या जीवाचे बलिदान दिले त्यांच्यावर मला अभिमान आहे आणि मी त्यांची माहिती काढण्यासाठी मी खूप उत्सुक घेते. मी खूप जणांना म्हणजे ज्या लोकांची खूप महती आहे. जसे स्वच्छतासाठी पहिले पुढे येतात - 'अमीर खान' सत्यमेव जयते आणि गावोगावी लोकांना पाण्याची मदत करणे ह्या सर्वांना पाहून मला सुद्धा आपल्या भारताविषयी विचार येतो की मलासुद्धा काहीतरी त्या लोकांना मदत जे अनात आहेत, ज्याला घर नाही, जे मंदिराच्या बाहेर भीक मागत बसतात त्यांच्यासाठी मला मदत करायची. जेव्हा मी मोठी होईन म्हणजे माझी १२ वी होईल मीसुद्धा ''मेघा ताई'' सारखी एक संस्था / ग्रुप काढून त्या लोकांची मदत करेल आणि मी खूप आभारी आहे. की आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. जर आम्हाला स्वातंत्र्य मिळाले नसते तर मी हे सर्व कार्य लोकांसाठी करू शकले नसते आणि स्वत:च्या पायावर उभा राहिली नसते.

**■ श्वेता कै. तांबे, ९ वी**

भारतात असे खूप लोक अजून पण गरीब, गरजू, पैसे नसल्यामुळे त्याचे शिक्षण होऊ शकत नाही. काही लोक मदत करतात. तर काही करत नाही. म्हणून काही लोकांना आपण मदत केली पाहिजे. आपण शिक्षण घेतो इतरांना पण आपण शिक्षणाची मदत करतो. महात्मा गांधींनी हा उपदेश दिला. महात्मा गांधी लढले तेव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. आपल्या भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले नाही. तर आपल्यावर इंग्रजांनी राज्य केले असते. आपला भारत देश इंग्रजाचा राहिला असता.

**■ साक्षी विश्वास मोरे, १० वी**

१५ ऑगस्ट १९४७ हा जगातील सर्वात मोठा दिवस म्हणजे जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतात सर्वत्र आनंद होता. हे सगळे शक्य झाले. कारण मोठमोठ्या व्यक्तींनी मिळून आपल्या प्राणाची पर्वा न करता भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी असे अनेक मोठ्या महान व्यक्तींनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले.

'स्वातंत्र्य' ही एक अशी गोष्ट आहे जी आज जगात सर्वांना हवीशी वाटते. आज सर्वांना सर्व गोष्टीत स्वातंत्र्य आहे.

भारत स्वतंत्र झाला, आहे आणि स्वतंत्र राहणार कारण फक्त मोठ्या महान व्यक्तीमुळे म्हणूनच मी त्यांचे आभार मानते. आणि मला खूप आनंद आहे. कारण त्या मोठ्या व्यक्तींमुळेच मला स्वातंत्र्य भेटले आहे. सर्वांना स्वातंत्र्य भेटले आहे. धन्यवाद...

**■ वैष्णवी लक्ष्मण झुंजारे, १२ वी**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत स्वतंत्र झाला त्यावेळेस आपल्या भारतावर इंग्रज राज्य करत होते. तो काळ भारतासाठी खूप दु:खजनक होता. तसे म्हणले तर भारत हा अधिकृतप्रमाणे १५ ऑगस्ट १९४७ साली ६ वाजता आपल्या भारताच्या ध्वज फडकवला व आपल्या भारत इंग्रजांच्या हातातून स्वतंत्र झाला. पण अजूनही कोणत्या कोणत्या क्षेत्रात कोणाकोणाचा गुलाम आहे. तरी भारत प्रयत्न करतोय, या सगळ्यांच्या तावडीतून सुटायचा आज भारत जगात ७ व्या क्रमांकावर येतो.

**■ महेश प्रमोद लोहकरे, १२ वी**

The Day we get freedom that was important in our life that time many people die and they give as freedom that's why we are in this world, For that thing I am happy and I feel proud about my Country. I Love My Country.

**■ Saloni R. Kamble, 10th Std.**

On this special independence let promise our motherland. That we will enrich the everything and preserve the beauty and heritage of our motherland. Our ethos in our treasure. We should stop the corruption and make the corruption-free India. We should literate the people as much as possible. We should educate the people. Make a India clean and green then only we can say that India got a independence in a right way. Make a India garbage - free and healthy India. We should not celebrate Independence day ones in the year but we have do it regularly.

**■ Tanaya Shinde, 10th Std.**

As we know that before 15th August we all were sweeping the halation of British people But today because of the struggle of great leader like Mahatma Gandhiji, Dr. Ambedkar and many other leaders. They all struggled for us to live a free atmosphere life. If they would not there, today also we were face the halation of British people.

So we must try to think and must be thankful to our great leaders and also we must try to spread the information of our great leaders. Jai Hind.

**■ Mahek Javed Syyed, 8th Std.**

# महिलाच्या स्वातंत्र्या संबंधी

पूर्वी महिलांना चूल आणि मूल एवढे स्वातंत्र्य होते. परंतु आजच्या आधुनिक युगात प्रत्येक महिलेने उंचभरारी घेतली आहे. पूर्वीची महिला आणि आताची महिला यामध्ये जमीन आणि आसमान एवढा फरक झालेला आहे. महिलानेही घरकामपासून ते पायलेटपर्यंत उंच भरारी घेतली आहे. आताची महिला ही फक्त घरातच नव्हे तर ती सगळ्या क्षेत्रांत पुढे गेलेली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात तिने उंच भरारी घेतली आहे आजची महिला ही सबला होऊन ती कुठल्याच कामात अडलेली नाही. महिला म्हणून मला खुप स्वातंत्र्य मिळाले आहे. बोलण्याची हिंमत, काम करण्याची ताकत, मिळालेली आहे. मी माझ्या मुलांसाठी, शिक्षणासाठी व त्याच्या सर्वांगीण विकासासाठी खूप प्रयत्न करणार, कारण महिला ही पुर्वीची महिला राहिली नाही. तीने सावित्रीबाई फुले, माता रमाई, झाशीची राणी, माता जिजाई यांचा आदर्श घेऊनच ती पुढे चालली आहे.

**■ श्रीमती पवित्रा शेलार, ब्रॅच नं. १, पुणे**

मला सांगण्यास आज मन भरून आलंय! आणि कंठ दाटून ही आलंय. आज मी मालकांच्या हयाती नंतर खंबीरपणे उभी राहु शकले नसते. जर त्यांनी मला नोकरी करण्याची परवानगी म्हणण्यापेक्षा ते स्वातंत्र्य दिले नसते. आज ते आयुष्यात नसताना सर्वच गोष्टी अवघड आहेत. पण त्यांच्या आठवणी, त्यांचे शब्द सोबत आहेत. म्हणून मी खंबीरपणे उभी आहे. अन्नपूर्णाची साथ आणि कष्ट यामुळे माझे पुढील आयुष्य सुखकर होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. धन्यवाद...!

**■ दीपाली सुधाकर सकपाळ, ब्रॅच नं. १५, पुणे**

मी लक्ष्मी सदाशिव तळेकर. मी सगळ्यात पहिले अन्नपूर्णातील ताईचे आभार मानते. अन्नपूर्णा परिवार माजासंगे हाहे म्हणून मला कशाची काळजी नाही. कारण मला असे वाटते की मला सगळ्या प्रकारचं स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. आमच्या सारख्या बायकांना खूप काही करावं लागतं. कारण माझे मिस्टर माजासंग नाही म्हणून मला दु:ख वाटते. मी आता दहा वर्षे झाले आईकडे राहते मला आई वडिलांची खूप साथ आहे. तसेच अन्नपूर्णा ताईची पण खूप साथ आहे. पायावर उभी राहून स्वत: काम करते. मला मुलीच्या शिक्षणासाठी कामाची गरज आहे. आता पर्यंत मी कोणाला पण त्रास दिले नाही, आता मात्र अन्नपूर्णा मध्ये माजे चौथा कर्ज आहे मी पोरीच्या शाळेसाठी कर्ज काढले ते मी नियमित भरते. जर आम्हालाच असे काम करायची संधी नाही भेटली तर असेच राहावे लागले असते. मी पहिले कामाला लागले. मी स्वत: माझ्या पायावर थांबले म्हणून मला आता कोणाची भीती नाही मी बिंदास काम करते, माझ्या मुलीला पण मी सांभाळते, म्हणून महिलांना सगळ्याच प्रकारचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, कुठल्याही कामाला महिलांना घाबरली नाही पाहिजे. मी कुठलीही परिस्थिती आली तरी घाबरत नाही, आजपर्यंत मी केस एकटी लढते. मीच जर अशी गप्प बसले असते तर मला काही कामे केले नसते. म्हणून मला आई वडिलांचा खूप अभिमान वाटतो. ते म्हणतात तू बिंदास राहा आम्ही तुमच्यामागे आहे असे मानतात महिला जरा बाहेर पडले तरच काम करू शकते. म्हणून आपण स्वत: ठामपणे आपल्या पायावर उभे राहून काम करायचे असेच पुढे नि माझ्या मुलीला चांगले शिक्षण देणारे व तिला पण स्वत:विषयी स्वातंत्र्य मिळाले पाहिजे म्हणून मी अन्नपूर्णा ताईंचे खूप आभार मानते, ते असेच माझ्यासंग साथ आहे. म्हणून मला काळजी नाही. मी अन्नपूर्णा परिवाराची आभारी आहे.

**■ लक्ष्मी सदाशीव तळेकर, बॅच नं. १५, पुणे**

महिला म्हणून मला जे स्वातंत्र्य हवे आहे ते मला मिळाले. स्वातंत्र्य मिळाले म्हणूनच मी आज या बाहेरच्या जगात वावरते आहे. मी माझ्या मुलांचा सांभाळ करीत आहे. मी माझ्या आईचा सांभाळ करत आहे. माझे पती हयात नाहीत. तरीसुद्धा मी सर्व काही व्यवस्थित पार पाडत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे मला पुरेसे शिक्षण घेता आले की, ज्यामुळे मी समाजात ताठ मानेने जगू शकते.

आणि महिला म्हणून जे स्वातंत्र्य हवे आहे. त्यामुळे महिला होण्याचा मला अभिमान आहे.

**■ सुनंदा रंगलाल प्रसाद, बॅच नं. ४, पुणे**

महिला म्हणजे 'स्वातंत्र्य' या शब्दातच खूप मोठा अर्थ आहे. महिला म्हणून या समाजात वावरायला. मला महिला म्हणून प्रत्येक गोष्टीचे स्वातंत्र्य मिळाले आहे. ते म्हणजे मी कोणतेही काम न घाबरता न हरता करू शकते. मी माझ्या दोन्ही मुलांचे मला हवे तसे संगोपन करू शकते. मला हे स्वातंत्र्य मिळाल्यामुळे समाजात मला काही तरी करून दाखवण्याची धमक दाखवू शकले. म्हणजे एकटी महिला पण आपल्या मुलाचे चांगल्या पद्धतीने संगोपन करू शकते. महिलाने ठरवलेकी ती काहीही करू शकते. पण त्यासाठी महिलांना मनासारखे समाजात वावरण्याचे स्वातंत्र्य खूप गरजेचे आहे आणि ते स्वातंत्र्य मला असल्यामुळे मी एकटी खानावळ चालवून माझ्या दोन्ही मुलांचे संगोपन चांगल्या पद्धतीने करत आहे.

म्हणूनच महिलांना स्वातंत्र्य मिळाले तर त्या काहीही करू शकतात. जसे मी आता माझ्या स्वत:च्या पायावर उभी आहे आणि मला हवे तसे मी करू शकते. मी माझ्या स्वातंत्र्याचा पुरेपूर फायदा करून घेतला आहे. म्हणजेच मला जसे शिक्षण घेता आले नाही. पण मी माझ्या दोन्ही मुलांना चांगले शिक्षण देऊ शकते. यातच माझ्या स्वातंत्र्याचे मोठे समाधान आहे.

**■ प्रिती सुनील वाघमारे, बॅच नं. ४, पुणे**

महिलांना प्रत्येक गोष्टीत अडचणी येतात. पुरुषांना जसे प्रत्येक गोष्ट करताना ते म्हणतील तसे ते करू शकतात. पण महिलांना कोणतेच स्वातंत्र्य नसते. आज मी एकटी महिला आहे. पण कमावताना मला फार अडचणी येतात. कोणत्याही क्षेत्रात वेळेची आणि एक महिला म्हणून खूप अडचणी येतात. उदा. मी शाळेत नोकरी करते. पण शाळेतून आल्यानंतर मी जर एखादे कुरीयर पोहोच करणे पार्सल पोहोच करणे असे काम मी शोधत होते की जेणे करून मी शाळेतून बौद्धिक कष्ट नकोत म्हणून मी अशा प्रकारचे काम शोधत होते. पण घरातील मंडळी आणि समाज यांच्यामुळे असे काम मी करू शकले नाही. शेवटचा उपाय म्हणून मी क्लासेस सुरू करून मी माझा Income Source सुरू केला. स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय असते? हेच आपल्या समाजास अजूनही कळालेले नाही. असे का? का मुलींवर अजूनही अत्याचार होतात? का स्त्रीकडे अजूनही वाईट नजरेने पाहिले जाते? का ही प्रवृत्ती अजूनही आपल्या समाजात आहे. ती का मुळासकट नष्ट होत नाही? का मुलींना उशिरापर्यंत बाहेर कामानिमित्तही थांबता येत नाही.

ही प्रवृत्ती बंद व्हायला हवी. याची सुरुवात सर्वात आधी आपल्यापासून आपल्या घरापासून व्हायला हवी. घरात बदल झाला, तर समाज बदलेल, समाज बदलला तर वाईट प्रवृत्ती नष्ट होईल आणि खऱ्या अर्थाने आपणास विशेषत: महिलांना स्वातंत्र्य मिळेल.

**■ श्रीमती दीप्ती बोराटे, बॅच नं. ६, पुणे**

महिला म्हणून मला स्वातंत्र्य हा खुप मोठा शब्द आहे. महिलांवर जो अन्याय होतो तो होऊ नये. अन्याय शिक्षा झाली पाहिजे. महिलांना या जगात करणाऱ्याला स्वतंत्र वातावरण मिळाले पाहिजे. त्यांना त्यांच्या मर्जीने जगता आले पाहिजे असे मला वाटते. महिलांना अजूनही खूप त्रास होतो तो थांबला पाहिजे. लहान मुलींवर अत्याचार होतो तो थांबला पाहिजे. अत्याचार करणाऱ्यांना फाशी झाली पाहिजे.

**■ शांता सुरेश अवसरे, बॅच नं. ४, पुणे**

मी वैष्णवी राजेंद्र टाकोडकर, राहणार मिलिंद नगर मि. पहिल्यांदा घरा बाहेर पडले, ते दिवस म्हणजे माझे मिस्टर Expire झाल्यानंतर कामासाठी बाहेर पडले व माझ्या डोक्यात एकच विचार आला की आता माझे कसे होणार व माझ्या मुलाबद्दल विचार मी आता कसे एवढे सगळ्यांना कसे सांभाळणार व हे एकच विचार चालू होता की माझ्या आयुष्यातील पहिला अन् मी सगळीकडे कामासाठी भटकू लागले होते.रानारानात मी डोळ्यात दररोज पाणी काढत मी गाव सोडून गावी म्हणजे पुणे येथे आले व मला इतका प्रोत्साहन माझी चुलत नणंदने मला येथे आंकुर्डी स्ट्रार हॉस्पीटलमध्ये कामाला लावले तेव्हापासून माझ्या मनात संगळ्यांबद्दल धैर्य आला व मी संगळ्या व्यवस्था म्हणजे माझ्या सासू व माझी तीन मुले यांना सांभाळते असे वाटले. तेव्हा त्यातून मला तरी स्वातंत्र्य तरी आहे. पण सगळ्यांना सामोरे कसे जावे व त्यांना पाठिंबा द्यावा. हे सगळे मी पुणेमध्ये आल्यानंतर शिकले व येथे सर्व लोकांना आपुलकीने कसे बोलावे व त्यांना सामोरे कसे जावे हे सगळे मी पुणे येथे आल्यानंतर शिकले. मी माझ्या मुलांना खूप खूप शिकवीन व चांगले त्यांना बनवून घडवून आणेन. मला दोन शब्द मनोगत लिहिण्यास सांगितले अन्नपूर्णा याबद्दल धन्यवाद...

**■ वैष्णवी राजेंद्र टाकोडकर, बॅच नं. १५, पुणे**

पहिल्यांदा मला स्त्री होण्याचा अभिमान आहे. मला माझ्या घरच्यांनी कधीही मी एक मुलगी आहे. हे जाणवू दिले नाही. मला मुलांसमानच वागणूक दिली. मला कधी मुलगी आहे. म्हणून तू हे करू नको. तू मुलगी आहेस. तू हे केलेच पाहिजे असे कधी कुठल्याही गोष्टींचे बंधन असे नव्हते. मी एक स्त्री असल्यामुळे मला अनेक नवीन नात्यांची ओळख झाली. लहानपणापासूनच मला काही वेगळे करण्याची आवड होती. परंतु ती इच्छा माझी अपूर्णच राहिली. पूर्वी मुलींना बाहेर खेळण्यास काहीच भीती नव्हती. मुली आनंदाने खेळायच्या. शाळेत जातानाही कसलीच भीती नव्हती. परंतु आत्ताच्या काळात लहान मुलींना बाहेर काढण्याचीही भीती वाटते. बालवयातील मुलीवर अत्याचार करणारे किती तरी घटना घडल्या आहेत. स्त्री असली म्हणून तिने घराबाहेर जाऊ नये. आपल्या आवडीनिवडी नुसार वागू नये का? स्त्रीलाही अधिकार आहे. मान उंचावून जगण्याचा स्त्रियांनी नेहमी धाडसाने जगावे.

आपल्यावर परिस्थिती आल्यावर तिने त्या परिस्थितीचा सामना करण्याचे धाडस तिच्यामध्ये असावे. न घाबरता तिने सर्व गोष्टी कराव्यात. पूर्वी स्थिती होती की स्त्रीसाठी फक्त चूल आणि मूल, परंतु आता स्त्रीही पुरुषांप्रमाणे बाहेर कामही करू शकते व घरही सांभाळू शकते. स्त्रीमध्ये सर्व काही करण्याची एक शक्ती असते. ती घरही सांभाळू शकते. बाहेर कामही करू शकते.

**■ बॅच नं. ५**

महिला म्हणून मला स्वातंत्र्य मिळालेले आहे. मी माझ्या मनाप्रमाणे विचार करण्याचं मला स्वातंत्र्य आहे. महिला मी कस रहाव जगाव हे पुर्णपणे माझ्या स्वत:वस्थ अवलंबून आहे. आजच्या काळातील महिला आपल्या मनाप्रमाणे शिक्षण घेवून मोठ्या हुद्द्यावर काम करण्याचे स्वातंत्र्य आज त्यांना मिळालेले आहे आणि त्यात त्यांना त्यांच्या कार्यात आई-वडीलांनी काम करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.

आजच्या काळातील महिला पुरुषांपेक्षा पुढे जाऊन सगळ्यांच क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करत आहेत. हे सगळा झाल ते त्यांना दिलेल्या स्वातंत्र्यामुळेच.

आज महिलांना सगळ्याच बाबतीत स्वातंत्र्य मिळाल नसत तर आज प्रत्येक घरात मुलगी शिकून मोठी झाली नसती.

तरी आपल्या देशात बऱ्याच महिला आहेत ज्यांना अजून स्वातंत्र्य मिळालेच नाहिए आणि अजूनही आपल्या देशात मुलींना जन्माला येण्याआधीच मारले जाते. ह्या बाबतीत काही महिला अजून पारत्र्यांत्यातच आहे. त्यांना स्वातंत्र्य मिळाले नाहीए.

**■ मनिषा मंगेश राठोड, बॅच नं. १७, पुणे**














अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री सुरेश धोपेश्वरकर यांनी ''संवाद त्रैमासिक'' न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.